# दीक्षित स्वामीमहाराजांचे चरित्र

## सभाषान्तरं

# ।।श्रीचरितामृतम् ।।

# लेखक



पं. बापूशास्त्री कोडणीकर

# अमृतबिंदू

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नम:।

अमराख्यपुरे च योगिनीवरदो योखिलदोस्ति योगिनी: । स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेस्ति परावरा गति: ।। १ ।।

भगवान् आणि भगवद्भक्त या दोघांचीही चरित्रे, मनाची शुद्धी व शांती यांना सारखीच उपयुक्त आहेत. श्रीरघुनाथाचे रामायण जितके आनंददायक आहे तितकेच त्यातील श्रीहनुमानांचे सुंदरकांडही आल्हादजनक आहे. शास्त्रदृष्टीने पाहाता, रघुनाथ आणि हनुमान एकच आहेत. एक रूप स्वामिकर्तव्य व्यक्त करणारे आहे, तर दुसरे रूप सेवकाचे कर्तव्य व्यक्त करणारे आहे. व्यवहारात मात्र स्वामी व सेवक हे भिन्नच राहून स्वकर्तव्य करीत राहणार. तत्त्वत: त्यांचा अभेदच आहे.

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदुर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम्" या श्लोकात असामान्य सेवक व असामान्य स्वामी दोन्ही ठिकाणी एकच ईश्वरतेज कार्य करीत असल्याची ग्वाही भगवंतांनी दिलेली आहे.

पं. बापूशास्त्री कोडणीकरांनी लिहिलेले हे श्रीनृसिंहसरस्वती महाराजांचे चरित्र, हीच तत्त्वदृष्टी ठेऊनच लिहिलेले दिसते. यामुळे, हे चरित्र एका अंधश्रध्द लेखकाने लिहिले आहे, म्हणून त्याबद्दल फारसा विचार करण्याचे कारण नाही असे एकाएकी कोणाही चिकित्सकाला वाटल्यास तो अविचार ठरेल.

'यावज्जीवं त्रय: सेव्य: वेदान्तो गुरूरीश्वर: ही भूमिकाच खऱ्या सेवकाची शेवटपर्यंत असते. कारण, 'वासुदेव: सुर्वम सकलमिदमहं च ही वृत्ती त्या महात्म्याची असते. असे असूनही 'पायीची वहाण पायीच बरी' याच वृत्तीचा परिपोष व्यवहारात त्यांचेकडून होत राहातो. यावरून 'वासुदेव: सर्वम्-अहमपि' या दृष्टीने पाहता हे भक्त वासुदेवस्वरुपच आहेत. ही अभेद दृष्टी बाणलेली असताना सर्व कर्तृत्व त्याचेच आहे. त्यामुळे 'कालोस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्ध: लोकान्समहर्तुमिहप्रवृत्त:। ऋतेपि त्वां न भविष्यन्ति सर्वे येवस्थिता: प्रमुखे धार्तृराष्ट्रा:' असे वास्तव सामर्थ्यद्योतक भगवंताचे सांगणे स्पष्टपणे अर्जुनाला आहे. माझा मीच सर्व संहार करणार आहे. तू गेलास तरी तो थांबू शकणार नाही. यथार्थ अंहकार, पूर्ण ज्ञानी पुरूषाला शोभणाराच आहे. कारण सर्वकर्तृत्व वस्तुत: त्याचेच आहे. पण ही पूर्ण दृष्टी असूनही वरीलप्रमाणे सर्वकर्तृयुक्तपूर्ण अहंकाराची भाषा केव्हाही न करता, 'शाखामृगस्य शाखाया: शाखां गन्तुं पराक्रम:। यत्पुनर्लघ्ंितोंभोधि: प्रभावोयं प्रभो तव' हीच भाषा स्वामींजवळ काढून, 'जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा', या प्रमाणे दास होण्यातच धन्यता मानणारे भगवद्भक्तच व्यवहार दृष्टीने श्रेष्ठ ठरत नाहीत काय ? आणि अंतर्बाह्य ही वृत्ती ठेवून वागणारे भक्तच पूर्णज्ञानी अतएव 'ज्ञानीत्वात्मैव मे मतम्' या वचनप्रमाणे भगवत्स्वरूपच आहेत. श्रीनृसिंहसरस्वती महाराज याच कोटीतील होते; म्हणजे ते भगवान् असूनही भक्त होते आणि भक्त असूनही भगवान् होते. हे शास्त्रनिकषाने व प्रत्यक्ष सहवासाने जाणून लेखकाने हे चरित्र लिहिले असल्याने याला विशेष महत्त्व आहे.

श्रीमहाराजांचा, पूर्ण शम व तन्मूल पूर्ण ज्ञान यांचा यथार्थ अनुभव घेतलेली मंडळी अद्यापि पुष्कळच आहेत. असे असूनही 'यतीट्सेवितानंदपादाब्जयुग्मं सदा मे हृदि स्थास्नुतां यातु देव, त्वयि भक्तिं मे वर्धय दुर्वृत्तम ईश नाशय अशेषम् यच्च तवेष्टं तत्कुरू मयि भो: सर्वज्ञ वक्तुमसमर्थ:' ही आपल्या गुरूदेवांचे जवळ त्यांची प्रार्थना नित्य चालू असे. 'भक्त्यर्थ कल्पितं द्वैतमद्वैतादपि सुंदरम्' हा सुमधुर भक्तीज्ञानाचा संगम श्रीमहाराजांचे ठिकाणी होता. यामुळे 'अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थिति:' इत्यादी दैवीसंपत्तीचा पूर्ण विकास त्यांचे ठिकाणी झालेला दिसून येत असे.

चारही आश्रमधर्मांचे यथाविधी परिपालन श्रीमहाराजांनी केले व श्रीगुरूसेवा कशी करावी हेही त्यांनी सर्वांना दाखवून दिले. हेच 'गुरूसेवा कथं कार्या कथं वा गुरुशिष्यता। दर्शिता दर्शभूता स यां कृत्वा लभते परम् ।। या श्लोकात लेखकांनी व्यक्त केले आहे.

कर्म, ज्ञान, योग, भक्ती यांचे आदर्शभूत असे श्रीमहाराजांचे चरित्र लिहिणारे लेखक आणि ते प्रकाशित करणारे प्रकाशक दोघेही धन्यवादास पात्र आहेत.

जिज्ञासू सज्जनांनी प. प. श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामीमहाराज यांच्या ह्या चरित्राचे चिंतन करून कृतार्थ व्हावे हीच सर्वेश्वराजवळ प्रार्थना !

## प्रस्तावना

श्रीदत्त: शरणम्।

सद्गुरूस्मरणं यस्य चित्ते पूज्य: स सर्वत:।

गुरूनामसुधापानं यस्य सो प्यमरो भवेत् ।।

सामान्य जनांच्या दृष्टीने संत-सत्पुरूषांच्या चरित्राचे महत्त्व मुद्दाम वर्णावे असे नाही. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' हे वचन सर्वश्रुत आहे. मनुष्याच्या इहपर कल्याणाचे परमसाधन म्हणजे धर्म, समाजाची धारणा हीही धर्मामुळे. या धर्माचे रक्षण संत-सत्पुरूष करीत असतात. किंबहुना संत-सत्पुरूष हे साक्षात भगवत्स्वरूपच असतात; म्हणूनच त्यांच्या सच्चरित्रांचे चिन्तन हे चित्तस्थैर्याचे अमोघ साधन ठरते; यात शंका नही.

आज येथे, एका भगवत्स्वरूप सतपुरूषाचे 'चरितामृत' सेवनाचा योग आला आहे; ही ईश्वरी कृपा होय.

कृष्णातीरावरील सुविख्यात श्रीदत्तक्षेत्र नृसिंहवाडी ही अनेक योग्यांची, सत्पुरूषांची तपोभूमी. या भूमीमध्येच परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामीमहाराज - हा श्रीदत्तप्रभूचा योगिराज अवतार आविर्भूत झाला.

श्रीस्वामीमहाराजांच्या कृपाप्रसादाने अनेक दत्तावतार सिद्ध झाले. श्रीनृसिंहसरस्वती दीक्षितस्वामी - हा असा एक चित्ताकर्षक दत्तावतार होय. श्रीदिक्षित स्वामीमहाराजाना त्यांच्या पूर्वाश्रमी विद्यार्थिदशेतच श्रीगुरुचरणांचा आश्रय लाभला. संध्येपासून सर्व आचारधर्मांचे पाठ त्याना श्रीगुरूंनी दिले; याचा श्रीगुरूंनाही सार्थ अभिमान वाटे. श्रीगुरूंच्या अनुज्ञेनेच विवाहोत्तर त्यानी शुक्लवृत्तीने अग्निउपासना केली; यथाक्रम पाशरहित होऊन संन्यास ग्रहण केला. पुढे साक्षात् श्रीदत्तप्रभूंच्या आज्ञेवरून श्रीगुरूंनी त्यांना दंड दिला आणि श्रीनृसिंहसरस्वती असे नाव ठेविले. श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामीमहाराज हे श्रीमद् वासुदेवानन्द सरस्वती स्वामिचरणांचे एकमेव दंडी संन्यासी शिष्य होत हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

श्री दीक्षित स्वामीमहाराज हे श्रीगुरूंच्या आज्ञेने नृसिंहवाडी येथेच श्रीदत्तप्रभूंचे उत्सव, उत्सवमूर्तीची उपासना करीत राहिले. नृसिंहवाडी समीप कृष्णेच्या पुर्व तीरावर अमरापूर येथे श्रीअमरेश्वरासन्निध श्रीगुरूंच्या पादुका स्थापून श्रीमद् वासुदेवानंदसरस्वती पीठ निर्मिले. आणि या पीठामध्येच श्रीगुरूरचित सारे वाङ्मय संग्रहित केले.

श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामीमहाराज यांची गुरूभक्ती निरूपम होती. श्रीगुरूंचे त्यांच्यावरील प्रेमही निरतिशय होते. कोणताही ग्रंथ लिहून झाला म्हणजे प्रथम त्यांची लेखी मूळ प्रत, ते श्री दीक्षित स्वामीमहाराजांच्याकडे पाठवीत. श्रीमद् वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांची वाङ्मय संपदा ईश्वरी असून श्रीदीक्षित स्वामीमहाराजांनी अहर्निश श्रीगुरूंच्या या वाङ्मयाचेच चिन्तन केले.

दीक्षित स्वामीमहाराजांच्या ठायी चंद्रासारखी पूर्ण शान्ती विलसे. तेथे क्रोधाची वार्ताही नव्हती. श्रीदत्तप्रसाद आणि श्रीगुरूकृपा यायोगे ते स्वयं श्रीगुरूसम झाले. त्याना आता सारे 'श्रीमहाराजांचे साक्षात् प्रतिबिंब' असे यथार्थत्वाने मानीत.

श्रीमद् वासुदेवानंदसरस्वती स्वामीचरणांच्या कृपानुग्रहाने सिद्ध असा हा चित्तवेधक दत्तावतार आश्विन वद्य सप्तमी, शके १८४९ या दिनी अयोध्या येथे श्रीरामचरणी लौकिकार्थाने समाप्त झाला.

आज येथे या भगवत्स्वरूप श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामीमहाराजांचे 'चरितामृत' सादर आहे. याची रचना श्रीनृसिंहवाडी येथील व्युत्पन्न शास्त्रवित्, तपःपूत पंडित, परमगुरूभक्त बापूशास्त्री कोडणीकर यांनी केली आहे. या रचनेमध्ये प्रारंभी श्रीस्वामीमहाराजांच्या वन्दनाचे एकादशश्लोकांचे मंगल स्तोत्र असून प्रधान चरितामृत पुढील एकशे दहा श्लोकांमधून संकीर्तित होते.

दक्षिण महाराष्ट्रात वेदगंगेच्या तीरावर शंकरापूर - सदलगा येथे श्रीदीक्षित स्वामीमहाराजांचे आचारशील, श्रीदत्तप्रिय असे पूर्वज राहात होते. ईश्वरी संकेताने ते यथाकाल नृसिंहवाडी येथे आले. या पुण्यशील पूर्वजांच्या तपाचे श्रीदक्षित स्वामीमहाराज हे मनोहर फल होय. ही सारी पुण्यकथा चरितामृताच्या पहिल्या बासष्ट श्लोकांमधून मृदु-मधुर अशी वर्णिली आहे. श्रीस्वामीमहाराजांचे शैशव, उपनयन, सद्गुरू-आश्रय, अध्ययन, संन्यासग्रहण आणि दंड-धारण यांचे मनोज्ञ दर्शन पुढील पंधरा श्लोकांमधून होते.

श्रीस्वामीमहाराजांचा नृसिंहवाडीमधील मंगल निवास, अमरापूर येथील गुरूपीठाची स्थापना, भारतातील साऱ्या पुण्यक्षेत्रांमधील श्रीस्वामीचरणांचा संचार, श्रीगूरूंच्या कीर्ति-परिमलाचा प्रसाद, त्यांच्या प्रसादाचे मुक्त वाटप, आणि मर्यादापुरूषोत्तम श्रीरामचरणी ऐक्यः अन्तःकरणाचा ठाव घेणाऱ्या पावन चरित्रकथेने चरितामृत पूर्ण झाले आहे.

मूळ चरितामृताची रचना गीर्वाण वाणीमध्ये असून ग्रंथकर्त्याने त्याचा मधुर असा मराठी अनुवादही दिला आहे. गीर्वाण वाणी ही मूलतः दिव्य वाणी, आणि येथे वर्ण्यविषय हाही दिव्यस्वरूपाचा, हा अमृतसिद्धी योग होय. चरितामृतात याचा ठायी ठायी प्रत्यय येईल.

सजल जलदवृन्दो मन्दमेषः प्रयाति।
किरति च वनमल्पं मंदमंद जगर्ज।।
प्रवहति पवमानः पाटलामोदचोरः।
प्रभवति परमेशो भक्तनष्टार्तिधीशो ।। ६१।।

श्रीस्वामीमहाराजांच्या अवतारसमयीचे हे वर्णन यथार्थ असून, गुरूसेवा कथं कार्या कथं वा गुरूशिष्यता। दर्शिताऽऽदर्शभूता सा यां कृ त्वा लभते परम् ।। ८९।। हे, श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्रातील रहस्यकथन प्रत्ययकारक आहे. आणि -

गणहीनो बभूवाथ गुणहीनोऽपि सर्वदः।
सगणं सुगुणं देवं पूजयामास सर्वदम् ।। १००।।

ही वाणी अन्तःकरणाचा ठाव घेते.

चरितामृताचा मराठी अन्वय आणि अनुवाद हाही विषयानुरूप गंभीर, चित्तवेधक आणि भावपरिपोषक असाच आहे.

ग्रंथकर्त्यांची ईश्वरनिष्ठा, परमगुरूभक्ती आणि श्रद्धाशील अन्तःकरण यांचे हे चरितामृत पक्वफल होय, यात शंका नाही.

श्रीमद् वासुदेवानंदसरस्वती स्वामीचरणानी श्रीदत्तप्रभूचे चरित्र वर्णिणारी 'श्रीदत्तभावसुधारस' ही मंत्रतुल्य दिव्य रचना केली आहे. श्रीमद् स्वामीमहाराजांच्या कृपाप्रसादाने सिद्ध असा गुर्जरभूमधील दत्तावतार पू. रंगअवधूत यांनी 'वासुदेवनामसुधा' - ही श्रीगुरूलीला कथन करणारी कृती निर्मिली आहे. गुरूभक्त बापूशास्त्री कोडणीकर यांच्या या 'चरितामृताने' 'श्रीदत्तभावसुधारस' 'श्रीवासुदेवनामसुधा' या रचनांचे स्मरण होते.

श्रीगुरू हे भगवंताचे अतीव मनोज्ञ स्वरूप होय.त्यांच्या चरित्राचे चिन्तन हे इहपरकल्याणसाधक ठरते. या चरितामृताने आम्हा वाचकांना आज हे भाग्य प्राप्त झाले आहे. यांचे सारे श्रेय ग्रंथकर्त्यांचे आणि ग्रंथाचे प्रकाशक श्रद्धाशील श्री. शिवराम दत्तात्रय नाईक आणि त्यांची सुकन्या चि. मंगल यांचे. चरितामृताचे सारे वाचक ग्रंथकर्ते पं. बापूशास्त्री कोडणीकर आणि प्रकाशक नाईक पितापुत्री यांचे नित्य ऋणी राहतील.

या चरितामृतासारख्या प्रासादिक रचनेवर प्रस्तावना लिहिण्याएवढा माझा अधिकार नाही. माझे गुरूचरण भगवत्स्वरूप पू. गुळवणी महाराज आणि गुरूतुल्य विद्यावाचस्पती ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या कृपाप्रसादाने हा श्रीगुरूसेवेचा योग आला. माझे पितृचरण ती. बलवंत यमाजी कुलकर्णी - केरूर - यांना श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामीमहाराजांच्या दर्शनानुग्रहाचा लाभ झाला होता. हे पुण्यच आज प्रसादरूपाने या प्रस्तावनेस कारण ठरले.

श्रीदत्तप्रभूची, श्रीगुरूंची कृपाकूर्मदृष्टी सर्वांवर नित्य असावी असे प्रार्थून ही अल्पसेवा श्रीगुरूचरणी सर्मपित करीत आहे.

## लेखकाचे हृद्गत

प.प. श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामी महाराज यांचे अद्वितीय पट्टशिष्य प.प. श्रीमन्नृसिंह सरस्वती - दीक्षित स्वामी महाराज यांचा सहवास व सेवा आमच्या सुदैवाने लहानपणापासूनच लाभली आणि त्यांच्या सद्गुणी व्यक्तिमत्त्वाने आमचे चित्त सर्वस्वी आपलेसे केले, आणि हे श्रीचरित्र लिहिण्याची प्रेरणा दिली. श्रीचरित्र लिहून बरेच दिवस झाले. परंतु ते प्रतिकूल परिस्थितीमुळे जनतेसमोर येऊ शकले नाही.

परंतु श्रीमहाराजांनीच प्रेरणा केल्याने श्रीमहाराजांचे मूळगाव शंकरापुर-सदलगा येथील आमचेसंबंधी व श्रीमहाराजांचे परमभक्त श्री. शिवराम दत्तात्रय नाईक व त्यांची कन्या चि. कु. मंगल या दोघांनी सेवाबुद्धीने हे चरित्र छापावयाचे ठरविले. यासाठी दोघांचेही आभार मानल्याशिवाय राहवत नाही. त्यांच्या या सत्कार्याचे फळ श्रीमहाराज त्यांना देतीलच.

माझे बालमित्र श्री. कवीश्वर यांनीही स्नेहाखातर व श्री. केरूर यांनी तर आमची ओळख म्हणजे नजरभेटही नसताना, ह्या पुस्तकाला प्रस्तावना देऊन त्याचे महत्त्व वाढवले ह्याबद्दल लेखक त्यांचा ऋणी राहील.

ज्यांच्या प्रेरणेने श्रीचरित्र लिहिले गेले त्या सद्गुरू महाराजांची आणखीही ग्रंथरूपाने सेवा घडून यावी विनम्रपणाने आणि भक्तिभावाने इच्छा करतो.

## प्रकाशिकेचे मनोगत

आज मला श्री दीक्षितमहाराजांचे चरित्र प्रकाशित करताना एक पवित्र कर्तव्य केल्याचे समाधान व आनंद मिळत आहे.

आमच्याकडून महाराजांना ही सेवा करवून घ्यायची होती हा विचार मनाला सुखवीत आहे. कारण श्री दीक्षितमहाराज मूळचे आमच्या म्हणजे सदलगा गावचे. त्यामुळे माझे वडील व शिवराम दत्तात्रेय नाईक हे ही त्यांचे भक्त आहेत. शिवाय महाराजांच्याबद्दल आमच्या मनात निरपेक्ष श्रद्धाभाव आहे. ह्या पुस्तकाचे लेखक पं. बापुशास्त्री कोडणीकर हे आमचे जवळचे नातेवाईक व महाराजही त्यांच्या गावचेच. लेखक चांगले संस्कृतज्ञ व कवी आहेत. त्यांचे स्वत:चे स्वतंत्र साहित्य प्रकाशित करण्याचा मान माझ्या वाट्याला आला याचा अभिमान वाटत आहे. पण यातही प्रेरणा महराजांचीच. आम्ही नुसते निमित्तमात्र !

मी प्रकाशित केलेले हे पहिलेच पुस्तक असल्यामुळे जगाच्या बाजारातले अनुभवाचे घोट अजून फारसे घशाखाली गेले नाहीत. त्यामुळे पुस्तकात काही चुका ह्या होणारच. तरिही चुकांकडे दुर्लक्ष करून आपण मोठ्या मनाने आमच्या पुस्तकाचे भरघोस स्वागत करून त्याच्या ह्या सत्कार्याला थोडाफार हातभार लावाल अशी अपेक्षा.

आमच्या प्रात:स्मरणीय महाराजांचे हे चरित्र जनतेसमोर आणण्याच्या कामात अनेकांचे सहकार्य मला लाभले. नेहमीच्या अध्यापनशील कार्यात अतिशय गर्क असूनही आदरणीय दत्तभक्त श्री. कवीश्वर यांनी वेळात वेळ काढून चरित्रातील अतिमधुर अमृतबिंदू दाखवून दिले.

एस.पी. कॉलेजचे प्राध्यापक श्री. केरूर यांनीही प.प. दीक्षित महाराजांच्या ह्या चरित्रावर त्यांचे विचार लिहून दिले.

किर्लोस्कर प्रेस, पुणे या मुद्रणसंस्थेने अगदी थोड्या काळात हे चरित्र छापून दिले.

या चरित्रप्रकाशनाच्या सत्कार्यात ज्या ज्या दत्तभक्तांनी आणि इतर सज्जनांनी आम्हास प्रोत्साहन दिले, सक्रिय मदत केली, त्या सर्वांचे मी सानंद आभार मानते.

प.प. श्रीमन्नृसिंहसरस्वती दीक्षितमहाराज चरितात्मकं स्तोत्रम्

निरकारोऽपि साकारो भूत्वा भक्तान्पुपोष ह ।।
तं भक्तवत्सलं वन्दे श्रीनृसिंहसरस्वतीम् ।।१।।
रामविप्रसुतो येन जीवितस्तीर्थ दानत:।।
तं भक्तवत्सलं वन्दे श्रीनृसिंहसरस्वतीम् ।।२।।
जुगालये तु दुग्धा गौ: पुनर्दुग्धवतीकृता ।।
तं भक्वत्सलं वन्दे श्रीनृसिंहसरस्वतीम्।। ३।।
येडुराख्ये पुरे पूर्वं सूचित: स्वीय आगम:।।
तं भक्तवत्सलं वन्दे श्रीनृसिंहसरस्वतीम् ।।४।।
विषयंत्वति दुर्बोधं स्वप्ने कथयति स्वयम्।।
तं भक्तवत्सलं वन्दे श्रीनृसिंहसरस्वतीम् ।।५।।
आगतान्दुर्विदग्धान् योचकार भजनधियान्।।
तं भक्तवत्सलं वन्दे श्रीनृसिंहसरस्वतीम् ।।६।।,
नैक दु:खाभितप्तान् हि भुवि सुख्यति सर्वदा ।।
तं भक्तवत्सलं वन्दे श्रीनृसिंहसरस्वतीम् ।।७।।

**योगिनीसहितं दत्तं श्रीपीठं चामरेश्वरम् ।।**
**प्रास्थापयद्देवपुरे यस्तं वन्दे पुनः पुनः ।।८।।**
**यशसालं चकाराऽसौ दिगंतान् हि गुरूप्रियः ।।**
**तं भक्तवत्सलं वन्दे श्रीनृसिंहसरस्वतीम् ।।९।।**
**स्तोत्रेणानेन यः कोपि स्तौति श्रीसद्गुरू मुदा ।।**
**तस्य सर्वाणि पापनि नश्यंति श्रीप्रसादतः ।।१०।।**
**श्रीगुरूदत्तरूपं हि बापुशर्मा दिवानिशम् ।।**
**स्तवीति प्राक् सुपुण्येन तं पायात्सद्गुरूः सदा ।।११।।**

## ।।इति श्रीचरितात्मकं स्तोत्रं संपूर्णम्।।

**।।श्रीगुरूदेव दत्त ।।**

**।।श्रीदत्तार्पणमस्तु ।।**

**।।श्रीगणेश दत्तगुरूभ्यो नमः ।।**

**।।विजयते नृसिंहसरस्वती ।।**

**।।प.प. श्रीमन्नृसिंहसरस्वती दीक्षितमहाराजानां**
**सभाषांतर चरितामृतम् ।।**

**सुधार्णवंति यद्वाचो राजीवंति च यदृश ः।।**
**न्यक्करोति सुधासुतिं यन्मुखं शारदं मुदा ।।१।।**

ज्यांचे भाषण अमृताप्रमाणे मधुर आहे. ते श्रवण करणाऱ्याला अमृतसागरातच आपण विहार करतो असे वाटते, जे प्रेमाने पाहू लागले असता लोकांना कमलवनात क्रीडा करीत आहोत असे वाटते आणि ज्यांचे मुखारविंद पाहून शरत्कालचा पौर्णिमेचा पूर्ण चंद्रही अधिक प्रसन्न आहे असे वाटत नाही. कारण ज्यांचे पाहणे, ज्यांचे भाषण व ज्यांचे दर्शन देहाचे विस्मरण करून देणारे असे अतिशय आनंददायक आहे.

**मंदस्मितमुखांभोज कुंडीदंडकरांबुजम् ।।**
**नृसिंहयति राजं तं वा वंदे धीविशुद्धये ।।२।।**

संपूर्ण दैवीसंपत्ती प्राप्त झाल्यामुळे ज्यांचे मुखकमल मंदहास्याने व प्रसन्नतेने रमणीय आहे. आणि ज्यांच्या हातामध्ये योगदंड व जलपूर्ण कमंडलू आहे अशा श्री यतिसार्वभौम श्रीनृसिंहसरस्वती-दीक्षितस्वामीमहाराजांना; दुष्ट वासनेचा नाश होऊन बुद्धी निर्मल, शुद्ध व्हावी यासाठी वारंवार प्रेमाने, आदराने आणि भक्तिभावाने नमस्कार करतो. हेतू हाच की जोपर्यंत कायिक, वाचिक व मानसिक पापाचरणाने मलिन झालेली बुद्धी शुद्ध झाली नाही, तोपर्यंत आम्हा संसाराविषयी जिवांची प्रवृत्ती ईश्वराधनेसाठी होणार नाही, म्हणून हे नमस्काररूप मंगल करून श्रीचरित्रास आरंभ करतो.

हे नमस्काररूप मंगल निर्विघ्न परिसमाप्तीचेही प्रमुख कारण आहे. यासाठी प्रथम दोन श्लोकांनी मंगल केले आहे.

**श्रीवेदगंगा प्रथिताऽतितुंगा । चंचत्तरंगाऽऽश्रित पांडुरंगा।।**
**सर्वाऽघभंगाऽऽदृत साधुसंगा । विराजतेऽतो जगदुत्तमांगा ।। ३ ।।**

वेदगंगा नावाची एक नदी आहे. ती पाप, ताप आणि दैन्य यांचा नाश करते. श्रीव्यासमहर्षींनी वेदमाहात्म्य लिहिले. त्यात वेदगंगेचे किती महत्त्व आहे ते वर्णिले आहे. ते वेदमाहात्म्य श्री स्कंदपुराणात प्रसिध्द आहे. या नदीच्या तीरावर श्रीरूक्मिणी-पांडुरंग प्रेमाने येऊन कायम राहिले आहेत. या नदीच्या पात्रात मोठमोठ्या लाटांचे नर्तन सुरू झाले म्हणजे नदी फारच रमणीय दिसते. दंडगे घराण्यातील पुण्यपुरूष श्री श्रीपादस्वामी व थोर थोर सत्पुरूष या नदीच्या तीरावर आश्रम बांधून राहिले आहेत. यास्तव या भारतात ही वेदगंगा नदी श्रेष्ठ गणली आहे. वेदगंगा म्हणजे भारताचा शिरोभागच आहे.

**तत्तीरे शोभते सम्यक् क्षेत्रं श्रीशंकरापुरम् ।।**
**पुराणवर्णितं दिव्यं देवर्षिगणमंडितम ।। ४ ।।**

या नदीचे तीरावर श्रीशंकरापूर, सध्या सदलगा असे नाव असलेले पुराणप्रसिद्ध पुण्यक्षेत्र आहे. ते फारच रम्य, देवनगरीसारखे आहे. या क्षेत्रात सदाचारसंपन्न वैदिक, शास्त्री, ज्योतिषी होते, आणि ते मोठे प्रसिद्ध विद्वान होते. कित्येक सत्पुरूषसुद्धा वसती करून राहिले आहेत. येथे अध्ययन व अध्यापन चालावे व वेदविद्या व शास्त्रे यांची अध्ययन व अध्यापन-परंपरा जिवंत राहावी, लोकांनी या शिवाय अन्य व्यवसाय करू नये यासाठी राजाने विद्वान लोकांच्या उपजीविकेकरिता माणकापूर गाव येथील लोकांना इनाम दिले आहे. सदलग्यातील वैदिक, शास्त्री, ज्योतिषी आणि अग्निहोत्री फार प्रसिद्ध होते.

**यत्राऽष्टतीर्थानि सुसिद्धिदानि ।**
**संति त्रिलोक्यां खलु कामदानि ।।**
**दृष्ट्वैव कृत्स्नानि सुविश्रुतानि ।**
**किमत्र चित्रं परमोक्षदानि ।। ५ ।।**

या क्षेत्रात आठ तीर्थे आहेत. ती सर्वत्र प्रसिद्ध आहेत. ती सर्व मन:कामना पूर्ण करण्याविषयी ख्यातनाम आहेत. या अष्टतीर्थांचे माहात्म्य असे आहे की केवळ तीर्थदर्शनाने मनोरथ पूर्ण होतात, तर मग तीर्थात स्नान, तीर्थजलपान, तीर्थपूजन सद्भावाने केले असता परमकल्याण का होणार नाही ? निश्चित होईल यात आश्चर्य नाही व शंका पण मुळीच नाही.

**तत्र सार्थे दीक्षिताख्येऽन्वयेऽभूत्द्विजसत्तम:।।**
**दैवीसंपत्समायुक्तो दत्तभक्तिपरायण: ।। ६ ।।**

याच क्षेत्रात नावाप्रमाणे अनुरूप अशा थोर व पवित्र दीक्षितकुलात एका भाग्यशाली पुण्यपुरूषाचा जन्म झाला. तो आपले आचरण शुद्ध ठेवी. कर्ममार्गावर विश्वास ठेवून तो श्रीदत्तप्रभूंच्या उपासनेत नेहमी गढून गेलेला असे.

**वर्णाश्रमाऽऽचारयुत: स भक्तिमान् ।**
**यत्रस्थित: स्वीयदयार्द्रदृष्टिमान ।।**
**तं द्रष्टुकाम: प्रतिपौर्णिमं सदा।**
**मुदा समायाति नृसिंहवाटिकाम् ।। ७ ।।**

वर्णाश्रमधर्माचे तो यथाविधी अनुष्ठान करीत असे. आणि भक्तीने श्रीदत्तमहाराजांची उपासना करी व श्रीशंकरापुरात-सदलग्यातच-समाधानाने राहात होता. पण विशेष म्हणजे तो भाग्यशाली दत्तमहाराजांचा आवडता भक्त प्रत्येक पौर्णिमेला आपल्या प्रेमळ भक्ताचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी प्रभू जेथे राहिले आहेत त्या, श्रीनृसिंहवाडीस पायीच श्रीदत्तदर्शनाला जात होता. फार काय, ते त्याचे व्रतच होते. वाडीस जाण्याचा नियम त्यानी कधीही मोडला नाही. वाडीस जावे, देवाच्या मनोहर पादुकांसमोरच स्नान करावे, श्रीच्या पादुकांवर भक्तिभावाने पाणी घालावे, त्रिकाळ श्रीदत्तपूजेचे वेळी उपस्थित राहावे, पालखीचा सोहळा पाहावा, त्या वेळी चौरी किंवा मोर्चल वारावे, पालखी संपताच देवे म्हणावे, अशी सर्व प्रकारची सेवा तो करीत असे. या नियमांत त्याने कधीही अंतर पडू दिले नाही.

**स्वयंसंपादिता येन सान्यर्था दीक्षिताभिधा ।।**
**यद्‌भक्तिसुलभो दत्तो दुर्लभोगर्भगोप्यभूत् ।। ८ ।।**

अशा प्रकाराने श्रीदत्तसेवेने व स्वत:च्या पवित्र धर्माचरणाने त्यांनी दीक्षित हे नाव मिळविले होते. अग्निहोत्री असल्याने त्यांनी यज्ञ केल्यामुळे दीक्षित नाव संपादन केले आणि प्रभुसेवेची दीक्षा घेतल्याकारणाने दीक्षित नाव मिळविले. दोन्ही बाजूंनी दीक्षित नाव अन्वर्थक होते. त्यांनी दुर्लभ असे दत्तप्रभू आपल्या उत्कट भक्तिभवाने सुलभ केले. म्हणजे निगुण व निराकार असूनही श्रीदत्तमहाराज त्यांच्या वंशातील परम साध्वीचे उदरी सगुण व साकार होऊन गर्भरूपाने राहिले.

**एंव गतेषु कालेषु प्रापतं दु:सहा जरा।।**
**तथाप्यकं विषह्यासौ प्रायति हि व्रतादरात् ।। ९ ।।**

याप्रमाणे काही काल लोटला. नंतर या द्विजश्रेष्ठाला त्रासदायक अशी वृद्धावस्था प्राप्त झाली, तरी दु:ख सहन करावे पण वाडीला जावेच. श्रीदत्तदर्शनोत्कंठा होती, आणि नियमही होता म्हणूनच जाणे होत होते.

**अथैकदाऽऽनदयुत: सच्चिदानंदमद्वयम् ।।**
**मनोहरं दत्तपदं दिदृक्षुर्निजगामह ।। १० ।।**

नेहमीप्रमाणे वाडीस जाण्याचा क्रम चालूच होता. एकदा ते द्विजोत्तम आनंदित अंत:करणाने नित्याचा सवयीनुसार सच्चिदानंद श्रीदत्तगुरूंच्या मनोहर पादुकेच्या दर्शनासाठी सदलग्याहून वाडीस निघाले. वृद्धपणामुळे पायी चालत जाणे कष्टप्रद होत होते, तरी श्रीदत्तदर्शनाची उत्कंठा पदयात्रेचे दु:ख वाटू देत नव्हती.

**गच्छन्पथि जयन्दत दत्त दत्तेति सादरम् ।।**
**आससादाशुतं कृष्णा पंचगंगासुसंगमम् ।। ११ ।।**

जाता जाता वाटेत “श्रीदत्त जय दत्त, जय जय दत्त”,“नमो भगवते दत्तात्रेयाय” असा श्रीदत्तनाममंत्र मुखाने चालूच होता. असे नामस्मरण करीत करीत ते दीक्षितकुलभूषण द्विजश्रेष्ठ श्रीकृष्णा व पंचगंगा यांच्या पवित्र संगमावर वाडीक्षेत्रात येऊन पोहोचले. या संगमतीर्थस्नानाचे पुण्य किती आहे. ते श्रीव्यासमहर्षींनी श्रीकृष्णा माहात्म्य या ग्रंथात सविस्तर वर्णिले आहे. तथापि या दीक्षितांचा नियम श्रीपादुकेसमोरच स्नान करण्याचा होता. पण वृद्धपणाने चालून दमलेले दीक्षित संगमावर आले आणि थांबले

.

**दृष्ट्वातिपूतं विप्रोऽसौ परं सौख्यमवापह ।।**
**ननर्त देहं विस्मृत्य दत्तस्मरणतत्पर: ।।१२।।**

असा हा अतिपवित्र संगम पाहताक्षणी त्यांना अतिशय आनंद झाला. इष्ट लाभ झाल्यामुळे तर फारच समाधान वाटले. आणि ते द्विजश्रेष्ठ श्रीदत्तनामस्मरणात रंगून गेले. ते इतके त्यात तल्लीन झाले की या पांचभौतीक देहाचेही स्मरण त्यांना राहिले नाही. आणि ते परमभक्तीनें नाचू लागले. इच्छित फळ मिळाले म्हणजे मिळविण्यासाठी झालेल्या कष्टाचे काहीच वाटत नाही.

**अवोचत्परमंप्रेम्णा क्षेत्रमाहत्म्यमुत्तमम् ।।**
**अहो ! धन्योऽति धन्योऽहं पश्याम्यद्य सुदुर्लभम् ।। १३ ।।**

नंतर काही वेळाने ते परमभक्त दीक्षितश्रेष्ठ शांत झाले. आणि त्यांनी श्रीनृसिंहवाडी व तीर्थ यांचे माहात्म्य आपल्या लक्षात आणले. ते बोलू लागले, ‘अहो! हे श्रीनृसिंहवाडी क्षेत्र व संगमस्थान किती पवित्र आणि रमणीय आहे! यांच्या दर्शनाने मी धन्य झालो. अतिशय धन्य धन्य आहे मी. देवांनादेखील दुर्लभ, न घडणारे असे श्रीक्षेत्रदर्शन घडले. हे माझ्या पूर्व पुण्याचेच फळ आहे हे नि:सशंय खरे.

**कृष्णावेणी सर्वतनु: पंचगंगासमन्विता ।।**
**यत्र श्रीदत्तसंचार: पावनं किमत: परम् ।। १४।।**

श्रीकृष्णावेणी किती पवित्रतम नदी आहे. श्रीकृष्णा नदी साक्षात् विष्णुरूप आणि वेणी नदी श्रीशंकररूप आहे. या दोन्ही नद्या एकरूपाने-अभिन्नपणाने दिसतात. म्हणूनच कृष्णेला केवळ कृष्णा असे नाव नसून तिला श्रीकृष्णावेणी असे म्हणतात. अशा या दोन नद्या व पंचगंगा-पाच नद्यांचे असे सात नद्यांचे मीलन या क्षेत्री झाले आहे. आणखी विशेष हा की श्रीदत्ताचे आवडते प्रमुख स्थान हेच आहे. आसमंतात श्रीगुरूमूर्तीचा संचार झाल्याने त्यांच्या चरणरज:कणांनी ही भूमी अत्यंत पवित्र झाली आहे. मग या स्थानापेक्षा अधिक पवित्र व श्रेष्ठ असे जगात दुसरे काय आहे? हेच सर्व क्षेत्रांपेक्षा आणि तीर्थापेक्षा श्रेष्ठतम होय.

**सुरर्षी साधवो नित्यं निवसंति यथासुखम् ।।**
**तेषां पुण्याश्रमा यत्र विराजन्ते महात्मनाम् ।। १५।।**

पवित्रतम अशा या श्रीकृष्णावेणी तीरावर देवर्षी, राजर्षी, महान् तपस्वी, साधू आणि धर्मनिष्ठ लोक मोठ्या आनंदाने-सुखाने राहतात. इतकेच नव्हे तर त्यांनी आपले पुण्याश्रमही पण श्रीकृष्णावेणी तीरावरच कायम राहण्यासाठी थाटले आहेत. त्यामुळे श्रीनृसिंहवाडीक्षेत्र हे प्रत्यक्ष भूवैकुंठपीठच होऊन राहिले आहे.

**यस्मिन्महान्ति तीर्थानि शुक्लादीनि विभांति च ।।**
**सर्वाघौघहरं क्षिप्रं पावनं किमत: परम् ।।१६।।**

याच श्री कृष्णावेणी तीरावर शुक्लादी आठ तीर्थे आहेत. ती फारच रमणीय व अत्यंत पवित्र आहेत. ती सर्व महापातके, उपपातके व कायिक, वाचिक व मानसिक पातकांचा नाश करणारी अशीच आहेत. फार काय या तीर्थांचे केवळ दर्शन झाले तर समस्त पातके नष्ट होतात. तर मग प्रत्यक्ष स्नान व तीर्थजलपान घडले असता सर्व पापांचा नाश होईलच होईल यात शंका व आश्चर्य नाही. म्हणून या क्षेत्रापेक्षा जगात कोणते क्षेत्र पवित्र असणार नाहीच.

**निवासकांक्षिण: सर्वे ज्ञानिनोऽपि विमोहिता: ।।**
**नृसिंहवाटिकायां तु पावनं किमत: परम् ।।१७।।**

या क्षेत्रात वास्तव्य-राहणे घडावे असे मोठेमोठे लोक, ज्ञानी लोकही इच्छा करतात. इतके ते या स्थानावर मोहित झाले की ते याच ठिकाणी येऊन राहिले आहेत. अद्वैतात परमेश्वराच्या एकपणात होणारा आनंद या क्षेत्रात मिळणाऱ्या आनंदापुढे काहीच नाही. पंचमपुरूषार्थात मिळणारा आनंद या स्थानात सहज निवास केल्याने मिळतो. मग जगात यापेक्षा पवित्र व श्रेष्ठ असे काय आहे?

**पापतापाभितप्तानां दर्शनादेव शांतिदम् ।।**
**श्रीदत्तराजधानीति पावनं किमतः परम् ।।१८।।**

या तीर्थराजाच्या दर्शनाने तत्काळ सर्व जिवांची समस्त पातके तर दूर होतातच शिवाय आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक त्रितापही जळून जातात. चित्त कसे शांत होते. अपूर्व आणि अवर्णनीय समाधान लाभते. राजाधिराज श्रीदत्तमहाराजांची चिरकाल वास करण्याची ही पुण्यभूमी आणि आवडती राजधानी आहे. राजा जसा आपल्या प्रिय राजधानीत आपल्या सिंहासनावर अधिष्ठित होतो व प्रजाजनांची गाऱ्हाणी ऐकतो आणि त्यांची दुःखे दूर करतो; तद्वत् श्रीदत्तमहाराज या नृसिंहवाडीत सिंहासनावर बसले आहेत. आणि ते भूतप्रेतपिशाच्चादी सर्व पीडा-सांसारिक यातना नष्ट करतात व आपल्या भक्तांना सुखमय करतात. म्हणून यासारखे पवित्रतम स्थान जगात नाही. सर्व तीर्थक्षेत्रांत हे अग्रेसर आहे.

**अष्टतीर्थसमायुक्तमेतत्तीर्थं सुविश्रुतम् ।।**
**कोऽपि तद्वर्णने शक्तः का कथानुस्तु सर्वशः ।। १९ ।।**

श्रीनरसोबावाडी हे क्षेत्र अष्टतीर्थांनी अलंकृत, सुशोभित झाले आहे. या पुण्यभूमीवर श्रीकृष्णावेणी नदी दक्षिणाभिमुख-दक्षिण दिशेकडे वाहते-जाते. तिकडे जाण्याचे कारण यमपुरी दक्षिणेला आहे. श्रीकृष्णवेणीचे मनात असे आले की आपण आपल्या तीरावर असलेल्या सर्व जीवजतूंना उद्धरून नेतो असे असता, यमधर्माने आपल्या तीरावरील कोणी यमपुरीला नेले काय ? ते पाहण्यासाठी आणि नेले असल्यास त्याचा यमधर्माला जाब विचारण्यासाठीच की काय ती दक्षिण दिशेकडे जाते. किती कनवाळू आहे आपली श्रीकृष्णावेणीमाता ! असे हे पवित्र क्षेत्र अखंड भारतात सर्वश्रुत सुप्रसिद्ध आहे. याचे माहात्म्य वर्णन करण्यास ब्रह्मदेवही असमर्थ आहे. तर मग मनुष्य कसे वर्णन करू शकेल ? करू शकणार नाही.

**इति स्तुवन्क्षेत्रपदं प्रार्थयामास सद्गुरूम् ।।**
**भावगद्गदवाक् भक्तो दत्तप्रणयविव्हलः ।।२०।।**

अशी त्या दीक्षितश्रेष्ठाने क्षेत्राची महती वर्णिली व श्रीदत्तप्रेमाने ते वेडेच झाले. कंठ सद्गदित झाला. तोंडातून शब्द फुटेना, वृत्ती तन्मय झाली. नंतर मनात विचार केला, आता नियमाप्रमाणे श्रीदत्तपादुकेसमोर स्नान घडणे शक्य नाही. पदयात्रेने आणि वृद्धपणाने त्राण राहिले नाही. काय करावे काही सुचत नाही, या संकटातून सोडविणारे एक श्रीदत्तमहाराजच समर्थ आहेत. त्यांनाच आळवावे. ते त्यांना अनन्यभावाने शरण आले व श्रीदत्तप्रार्थनेस आरंभ केला.

**भविष्यति कदा दत्त ! दर्शनं तव दुर्लभम् ।।**
**पतिष्यति ! नु मद्देहस्त्वदीये पदपंकजे ।।२१।।**

हे प्रभु ! भक्तवत्सला ! श्रीदत्तगुरो ! आपले परमपावन दर्शन केव्हा व कसे होणार ? माझा देह

आपल्या चरणकमलावर पडेल काय ? आता क्लेश सहन होत नाहीत, चालणे अशक्य झाले आहे; मग आपल्या रमणीय व मनोहर पादुकेसमोर येऊन दर्शन कसे होणार ? स्नान तर शक्यच नाही ! दीक्षितांना अशी श्रीदर्शनाची तळमळ लागून राहिली.

**अयमेव परो लाभो नृणां देहभृतां खलु ।।**
**शक्यते तत्कथं नाथ ! दुरापं प्रतिभाति मे ।।२२।।**

देहधारी मानवांचा हाच परम लाभ आहे. तो म्हणजे श्रीदत्तदर्शन होय. देवा ! आपले दर्शन स्वर्गीय देवांनाही दुर्मिळ आहे. तेदेखील तुमच्या दर्शनाची इच्छा करतात. असे आपले परमप्रिय दर्शन मला कसे घडणार ? ते शक्य दिसत नाही. देव स्वर्गात आहेत. पण मी या क्षेत्रात आपल्या समीप असूनदेखील देवाप्रमाणे मलाही ते दुर्लभ आहे. कारण माझी अवस्थाच तशी आहे.

**प्रभो मां पाहि विश्वात्मन् ! भक्तत्राणपरायण !**
**स्मर्तृगामीति वचनं श्रीश पालय पालय ।।२३।।**

हे दयाघना ! आपण स्मर्तृगामी आहात. ‘मी स्मर्तृगामी आहे’ असे आपणच म्हणता. आपल्या भक्तांचे सर्वदा रक्षण करता आणि त्यांच्या मनःकामनाही पूर्ण करता देवा ! ‘स्मरण करताच मी येतो’ हे आपले म्हणणे दुर्दैवाने आपल्या लक्षात येत नाही. काय ? आपण सर्व विश्वाला व्यापून राहिलात. प्रत्येक जीवांची मनोभूमिका आपल्याला समजते. तर मग स्मर्तृगामी हे आपले ब्रीद सत्य - खरे करा. ब्रीद सत्य नाही केले तर या वेळी माझ्यासारखा अभागी कोणीच नाही.

**दलादनाय मुनयेऽदर्शिरूपमनुत्तमम ।।**
**स्ववचोऽवितथं कतुं तत्कथं वितथं मयि ।। २४ ।।**

अहो दत्तमहाराज ! श्री दलादन नामक ऋषींना आपण आपले रमणीय दर्शन दिलेत. कारण त्या वेळी आपल्याला ‘आपण स्वतः सत्यवचनी आहो ! स्मरण करताच मी भक्तांना दर्शन देतो. आणि त्यांची मनःकामना पूर्ण करतो. हे ब्रीद खरे करून दाखवावे’ असे वाटले आणि तसे त्यांना त्या वेळी प्रत्यक्ष स्पष्ट सांगितले आहे. तर मग ते सत्य-वचन पाळणे माझ्या विषयीच का खरे करीत नाही ? प्रभो ! दीनदयाळा माझ्यावर कृपा करा. आपले ते सुंदर रूप मला दाखवा. ते केव्हा पाहीन अशी मला उत्सुकता - तळमळ लागली आहे. दाखवा ते रूप. प्रभो दर्शन द्या. एकदा तरी दर्शन घडू द्या.

**एवं दत्तपरोभूत्वा विलप्य च पुनः पुनः ।**
**स्नानमत्रैव कर्तव्यमिति निश्चितवान्तदा ।। २५ ।।**

याप्रमाणे श्रीप्रभू दत्तदेवाविषयी प्रेमाचा विलाप करून-दीक्षितांनी दर्शनाची पुनः पुन्हा याचना केली. आणि आता श्रीपादुकेसमीप तर जाता येत नाही, मग येथेच संध्यावंदनाही नित्य कर्मानुष्ठान तरी आटोपून घ्यावे. श्रीदत्तप्रभूची कृपा सत्वर होईल तर बरे असा विचार तेथेच स्नान करण्याचा निश्चय केला.

**उपद्रुतोऽपि जरसा तरसा विधिवत्तदा ।**
**सस्नौ तत्रैव नियमपराङ्मुखतया मुदा ।। २६ ।।**

भक्तश्रेष्ठ दीक्षित वृद्धावस्थेने ग्रासले होते. म्हणून त्यांना श्रीसमोर स्नान करणे शक्य नव्हते. मनात देवदर्शनाची तळमळ होतीच. श्रीदत्तपादुकेसमोर स्नान करणे ह्या नियमाचे - व्रताचे उल्लंघन होत होते. तरीही स्नानाची वेळ टळून जाते यासाठी या तीर्थात - षट्कुलात स्नान करणे पण उत्तम आहे. कारण या तीर्थाचे माहात्म्य व पावित्र्य अवर्णनीय आहे. म्हणून तशा अवस्थेतही त्यांनी मोठ्या आनंदाने संगमावरच विधिपूर्वक स्नान केले. आणि संध्योपासनादी नित्यकर्म उरकले. हे सर्व दत्तदर्शनाच्या तळमळीत झाले व ते संगमावरच श्रीदत्तदर्शनाची प्रतीक्षा करीत बसले.

**भवाष्टकसंभिन्नं स्वाभिन्नं भक्तराजमालोक्य ।**
**आविर्बभूव सद्यः श्रीदत्तो भक्तकामकल्पद्रुः ।। २७ ।।**

संसारातील सर्व त्रासांनी गांजलेला, शरीरपीडेने व्याकुळ झालेला व अष्टसत्त्विक भावांनी सुशोभित, आपल्या स्वरूपाहून निराळा नसलेला - तन्मय झालेला असा तो भक्त पाहून श्रीदत्तमहाराज स्वतःशी म्हणाले, 'हा माझा परमभक्त आहे. याला दर्शन देऊन मनःकामना पूर्ण केलीच पाहिजे. नाहीपेक्षा "स्मर्तुगामी, भक्तकामकल्पद्रुम, भक्तवत्सल, भक्ताभिमानी" या माझ्या बिरूदावलीला कलंक लागेल. हरताळ लावावी लागेल. आणि म्हटल्याप्रमाणे मी कृतघ्नही होईन. मला कोणीही भजणार नाही.' असे म्हणून दत्तमहाराजांनी त्यांना दर्शन द्यायचे ठरविले.

दीक्षितांनी समोर पाहिले तो काय चमत्कार! श्रीदत्तमहाराज त्या पवित्र श्रीकृष्णा पंचगंगा प्रकट झाले. त्या भक्तश्रेष्ठाचे भाग्य काय वर्णन करावे!

**मालाकमंडलुधरं शंखचक्रविराजितम् ।।**
**डमरूत्रिशलसहितं छाटीकौपिनमंडितम् ।। २८ ।।**

श्रीदत्तमहाराजांनी सगुणरूप या वेळी कसे धारण केले होते तर ते षड्भुज व एकमुखी असे होते. खालील हातात माला व कमंडलु धारण केले आहे. मधल्या हातात डमरू व त्रिशूळ घेतला होता. वरील हातात शंख व चक्र, अंगावर छाटीभगवे वस्त्र, लंगोटी नेसली होती.

**इंद्रनीलनिभं दिव्यं जटाजूटसमन्वितम् ।।**
**शरच्चंद्रमुखं शांतं ददर्शात्त्रिप्रियं विभुम् ।। २९ ।।**

इंद्रनील मण्याप्रमाणे नीलवर्ण व तेजस्वी अशी त्यांची काया होती. जटेच्या मुकुटाने मस्तक शोभिवंत दिसत होते. शरच्चंद्राप्रमाणे म्हणजे शरद ऋतूतल्या पूर्णचंद्राप्रमाणे मुख रमणीय व शांत दिसत आहे. जे अत्रिऋषीना प्रिय व त्यांना जे रूप दाखविले तेच सुंदर रूप धारण केलेल्या श्रीदत्तमहाराजांना भक्तराज दीक्षितश्रेष्ठांनी प्रेमाने पाहिले.

**अलौकिकं च तद्रूपं समालोक्य भृशं तदा ।।**
**स्वानंदरसमग्नोऽभूद्द्विजः प्राप्तमनोरथः ।। ३० ।।**

श्रीदत्तमहाराजांचे त्या वेळचे रुप केवळ सुंदरच नव्हते, तर ते अलौकिकलोकविलक्षण होते, दिव्य होते आणि रमणीय होते. लोकविलक्षण म्हणजे जगात सर्वसाधारण लोकांमध्ये नसणारे असे होते. रूप सुंदर असते पण ते रमणीय नसते.रमणीय म्हणजे पाहिल्यानंतर प्रत्येक्ष क्षणाला नवीन गोडी उत्पन्न करणारे. त्याला रमणीय म्हणतात. ते फक्त देवाचेच असते. लौकिक सुंदर रूप देशकालपरिस्थितीमुळे नकोसे वाटते. कारण ते रमणीय नसते. असे ते रमणीय श्रीदत्तरूप पाहण्यालादेखील श्रीगुरूकृपा पाहिजे. त्यांच्या कृपेने दिव्यचक्षूंचा लाभ झाला पाहिजे. त्याशिवाय ते रूप पाहता येत नाही. या दीक्षित द्विजश्रेष्ठाने-सद्भक्ताने-ते पाहिले. कारण श्रीदत्तमहाराजांनी त्याला दिव्यचक्षू दिले होते. आपले मनोरथ पूर्ण झाले, श्रीदत्तदर्शन झाले. त्यामुळे दीक्षितवर्य आनंदाने तन्मय झाले.

**सर्वभावं ननाम द्राक् वक्तुकामो लुलोठह ।।**
**नमंतं च लुठंतं तं वीक्ष्योवाच दयानिधिः ।।३१ ।।**

अष्टसात्विक भाव प्रकट झाले. बोलण्याची इच्छा असूनही कंठातून शब्द बाहेर पडेनासा झाला. अशा स्थितीत त्या सद्भक्ताने श्रीदत्तमहाराजांना साष्टांग नमस्कार केला आणि त्यांच्या चरणकमलावर तो लोळू लागला. अशा अनन्यशरण, नम्र आणि चरणावर लोळणाऱ्या भक्ताला पाहून दीनदयाघन प्रभूचे अंतःकरण भरून आले श्रीभक्तकामकल्पद्रुम, भक्तवत्सल दत्तमहाराज भक्तपरवश झाले व बोलू लागले.

**वरं ब्रूहि, वरं ब्रूहि ! वर ब्रूहि मम प्रिय ! ।।**
**त्वद्भक्तिवशगोऽहं ते करिष्येभीष्टमुत्तमम् ।।३२ ।।**

माझ्या आवडत्या सद्भक्ता ! वर माग. वर माग हे प्रेमळ भक्ता वर माग. मी तुझ्या या परमभक्तीने आनंदित झालो आहे व पूर्णपणे तुझ्या स्वाधीन आहे. तुझी मनःकामना पूर्ण करतो. तुझ्यासारख्या श्रेष्ठ भक्ताची कामना पूर्ण करणे माझे ब्रीद आहे. व्रत आहे.

**जगदुद्धरणार्थाय संभविष्यामि ते कुले।।**
**नराकारेण भो भक्त ! निराकारोऽपि सर्वदा ।।३३ ।।**

वर मागण्यासाठी परमभक्त दीक्षितांना आग्रह केला. प्रभुराजाने त्याला कुरवाळले. पुनः पुन्हा वराकरता त्याला आग्रह केला. पण सर्व व्यर्थ झाले. का तर श्रीदीक्षित या वेळी ज्या स्थितीत होते ती स्थिती बोलण्यासारखी नव्हतीच. म्हणून त्याने वरयाचना केली नाही. पण सर्वांच्या ह्रदयात राहणारे श्रीदत्तप्रभू त्यांची मन:कामना जाणत होते. खरेच आहे. या मानवाला देवाजवळ काय मागावे हेच मुळी कळत नाही. हिताहित समजत नाही. श्रीगुरूमाउलींना भक्तकल्याण कशात आहे ते बरोबर समजते. म्हणूनच श्रीदत्तमहाराज म्हणाले, हे भक्तश्रेष्ठ! जगाचा उद्धार, साधूचे परिपालन, दुष्टांचा नाश आणि धर्मस्थापना यासाठी मी अनेक अवतार धारण केले. निराकार असूनही साकार मायेच्या आश्रयाने मी मानवाकृती होतो. हे सर्व माझ्या भक्तांसाठी करतो. भक्ता ! तुझ्या मनातील हेतू समजला. त्याप्रमाणे तुझ्या वंशात मनुष्यरूपाने अवतार धारण करीन आणि दीक्षितवंशाचा उद्धार करीन. हे भक्तोत्तमा, यापुढे तू वाडीस प्रत्येक पौर्णिमेस येऊ नकोस. वारी-व्रत पूर्ण झाले.

**गृहाणेमान् प्रस्तरान् त्रीन् ब्रह्माविष्णुशिवात्मकान् ।।**
**निधाय देवतागारे कुरू तत्रैव दर्शनम् ।।३४।।**

याप्रमाणे बोलून श्रीदत्तमहाराजांनी श्रीकृष्णावेणीतील तीन दगड-गोटे हातात घेतले आणि म्हणाले हे गोटे नाहीत. तर ब्रह्मा, विष्णू आणि शंकर यांच्या स्थापना कर. आणि तेथेच माझे दर्शन घेत जा असे प्रेमाने सांगून ते त्रिमूर्ती दत्त दीक्षितांना दिले.

**इति तन्मानसं ज्ञात्वा वरं दत्वा जगामह ।।**
**दीक्षितोऽपि तथा प्रीत: शंकरापुरमभ्यगात ।।३५।।**

याप्रमाणे दीक्षितभक्ताचे मनोगत श्रीदत्तप्रभूंनी जाणले व त्यांना वरदान देऊन श्रीदत्तगुरू गुप्त झाले. थोड्या वेळाने ते दीक्षित देहावर आले. महाराजांना नमस्कार केला. श्रीदत्तदेवांनी दिलेली त्रिमूर्ती मोठ्या प्रेमाने घेतली. मन:कामना पूर्ण झाल्याने अतिशय आनंद झाला व नवीन उत्साह वाटला. केव्हा एकदा गावी जातो आणि या त्रिमूर्ती दीक्षित श्रीदत्ताची घरी स्थापना करतो असे झाले. आणि आनंद भरताच ते परमभक्त सदलग्याला गेले. आणि त्यांनी देवघरात श्रीदत्तप्रभूची स्थापना केली व तेथेच उपासना करू लागले.

**धन्योऽयं दीक्षित: पूर्व: पुरूषो नात्र संशय:।।**
**येन स्वभावप्राकर्ण्यादाकृष्ट: श्रीप्रद: प्रभु: ।।३६।।**

ज्यांनी श्रीदत्तकृपा संपादन केली, ज्यांना प्रत्यक्ष श्रीदत्तदर्शन झाले आणि श्रींनी ज्यांना आत्माच अर्पण केला ते दीक्षितकुलावतंस मोठे भाग्यवान्, धन्यच होत यात मुळीच शंका नाही. त्यांनी आपल्या उत्कट भक्तिप्रेमाने भक्ताला वाटेल ते देणारा प्रभू आपलासा केला.

**अद्यापि पूज्यते तत्र मूर्तित्रयमयो गुरू: ।।**
**अहो भाग्यं वंशजानां साक्षात्कृतपरात्मना ।।३७।।**

अद्यापि-अजूनही श्रीदत्ताकडून मिळालेल्या शिलायम त्रिमूर्ती दत्ताची पूजाअर्चा सदलग्यात चालू आहे. त्या दीक्षित वंशातील पुरूषांचे भाग्य किती वर्णन करावे! त्यांनी प्रत्यक्ष दत्तप्रभुचा साक्षात्कार मिळविला-देवाला घरी आणले. दीक्षित घराणे भगवत्भक्ताचे आहे अशी ख्याती आहे. त्या वंशाचे वर्णन किती व कोण करू शकेल ? वर्णन करणे अशक्य आहे.

**तदन्वये बभूवाऽथ लक्ष्मणो लक्षणान्वित:।।**
**द्विज: सल्लक्षणो यस्माद्बभौ सा लक्ष्माभिधा ।।३८।।**

त्याच पवित्र आणि प्रासादिक वंशात-दीक्षित कुलात लक्ष्मण दीक्षित या नावाने एक अतिथोर पुण्यपुरूष होऊन गेले. ते सर्व शुभलक्षणांनी युक्त होते. म्हणून त्यांचे लक्ष्मण नाव शोभून दिसत होते. सज्जनांच्या घरातच ईश्वराचा अवतार होतो. श्रीभगवद्गीतेत श्री भगवंताने म्हटले आहे **"शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते"** तात्पर्य श्रीदत्तकृपेनेच लक्ष्मण दीक्षितांचा जन्म झाला.

**सदाचाररत: शांत: क्षमी दांत: शुचिर्व्रती ।।**
**वदान्य: प्रियभक्तोऽसौ मितवागनुसूयक: ।। ३९ ।।**

भगवद्भक्त लक्ष्मण दीक्षित हे सदाचारसंपन्न होते. शांत, समाधानी होते. क्षमी-सुखदु:खादिद्वंद्व सहन करणारे होते. इंद्रियदमनशील व उदार होते. अल्पभाषी द्वेषरहित, ईश्वरभक्त आणि सर्व लोकांना आवडणारे होते. ते नियमित वागत असत.

**गुरोश्चरित्रपठनं त्रिकालं दत्तदर्शनम् ।।**
**पूजनं च परप्रेम्णा करोति विधिपूर्वकम् ।।४०।।**

श्री. लक्ष्मण दीक्षितांचा दैनंदिन नित्यक्रम असा होता श्रीकृष्णास्नान, दररोज नियमाने श्रीगुरूचरित्र वाचन, तीन वेळ श्रीदत्तप्रभूचे दर्शन, त्रिकाळ श्रीदत्तमहाराजांची यथाविधी षोडशोपचार आणि पंचोपचार पूजा करावी. अखंड ईशचिंतन करावे, श्रीदत्तसेवेतच काळ घालवावा.

**येनात्मसुनिवासेन कृता धन्या हि वाटिका।।**
**नृसिंहपूर्विकाऽयंतु क्षेत्रभूषणभूषण: ।।४१।।**

यानंतर पुढील काळात हे श्री. लक्ष्मण दीक्षित नृसिंहवाडीस कायमपणे राहाण्यास आले. त्यांच्या वास्तव्याने वाडी श्रेत्र धन्य झाले. वाडीतील लोकही त्यांचा आदरसत्कार करू लागले. कारण ते त्या क्षेत्राला भूषण होते. दीक्षितांची किर्ती सर्वत्र पसरली. ते अद्वितीय विद्वान होते म्हणून त्यांची ख्याती झाली.

**तंत्रीस्वरसहाय्येन पुराणं चान्वहं मुदा।।**
**पठति श्रीदत्तपूरो दत्तप्रणयनिर्भर:।।४२।।**

श्री. लक्ष्मण दीक्षित हे नृसिंहवाडी क्षेत्रात प्रतिदिनी सायंकाळी ४-५ वाजता तंबोऱ्यावर उत्तम सुश्राव्य-गोड असे पुराण सांगत असत. पुराण श्रीदत्तमहाराजांसमोर तर कधी दक्षिण द्वारात सांगत असत. विशेषत: श्रीमद्भागवत व महाभारत यांच्यावर विवेचन होत असे. श्रीदत्तराजाच्या कृपेने त्यांचा योगक्षेमही यथायोग्य चालत होता. पुराणाच्या वेळी श्रोतृसमुदाय अगदी तल्लीन होत असे.

**सर्व समर्प्य श्रीदत्तपादयोस्तु दिवानिशम् ।।**
**ध्यायं ध्यायं निनायासवात्रेयं कालमात्मन:।। ४३।।**

श्री. लक्ष्मण दीक्षितांनी आपले सर्वस्व श्रीचरणी अर्पण केले होते. रात्रंदिवस श्रीदत्तसेवा चालूच होती. चिरकाल श्रीदत्तदेवांचे ध्यान करावे; घडेल-मिळेल ती दत्तसेवा करावी. यदृच्छेने मिळेल त्यावर समाधान वृत्तीने प्रपंच चालवावा. त्यामुळे सर्व क्षेत्रवासीयांचे त्यांनी अतिशय प्रेम संपादन केले. सदाचरणाने राहावे, अतिथि-अभ्यागतांचा परामर्श घ्यावा, नियमाने पुराण सांगावे, श्रीदत्तप्रभूला नैवेद्य समर्पण करावा. त्याशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत. पंचमहायज्ञानी विहित अनुष्ठान करुन शांतपणाने श्रीक्षेत्र वाडीतच कालक्रमणा करीत. त्यामुळे ते वाडीत श्रेष्ठ झाले आणि त्यांना सर्व लोक पूज्य मानू लागले.

**यो ददर्श परग्रामे श्रीकृष्णासज्जलाप्लुतौ ।।**
**नैवेद्यसमये दत्तचरणौ भजकाग्रणी: ।। ४४।।**

श्री. दीक्षित एकदा परगावी गेले होते. ज्यांच्या घरी गेले, त्यांनी त्यांचा योग्य सत्कार केला. यांनी सर्व आन्हिक आपल्या नित्यक्रमाप्रमाणे पूर्ण केले. नंतर सर्व मंडळी भोजनास बसली. पण दीक्षितांचा नियम असा होता की श्रीदत्तमहाराजांच्या मनोहर पादुकांचे ध्यान करावे. नैवेद्य समर्पण करावा आणि भोजन करावे. पण त्या दिवशी पादुका ध्यानात येईनात. पादुकेवर पाणी दिसू लागले. त्यामुळे ते भोजनास बसेनात, लोकांनी विचारले दीक्षित असे का? त्या वेळी त्यांनी सांगितले. पादुकेवर पाणी आहे. पादुका लक्षात येत नाहीत. काय करू? त्या गावच्या मनुष्याने चौकशीकरता माणूस पाठविला. त्यांने येऊन सांगितले. दक्षिणद्वार झाकले आहे. पादुकेवर पाणी आले आहे. किती हे तादात्म्य! नंतर ध्यान पूर्ण करुन दीक्षितांनी भोजन केले. असे ते भक्तांमध्ये श्रेष्ठ होते.

**अहल्या सुभगा साध्वी तज्जायासुतिव्रता ।।**
**अनन्यशरणा धीरा सर्व कार्यानुगामिनी ।। ४५।।**

श्री. लक्ष्मण दीक्षितांची धर्मपत्नी अहिल्या नावाची होती. ती साध्वी पतिव्रता एकनिष्ठेने पतिसेवा करी. पती हाच आपला देव असे समजून निश्चय करून कसलीही प्रापंचिक दु:खे सहन करी. अशी ती धीर, सर्वकार्यात कुशल होती. आपल्या पवित्र आचरणाने पतीच्या कीर्तित भर घालीत होती. तिचे शुद्धाचरण सर्व स्त्रियांना अनुकरण करण्यासारखे होते. ते आदर्शभूत असेच होते.

**पतिं हि परमेशानं सेवयामास सान्वहम् ।।**
**मन्यमाना कृतार्थाऽहमिति निश्चितमानसा ।। ४६ ।।**

ती साध्वी अहल्यादेवी आपला पती प्रत्यक्ष परमेश्वर आहे तसेच समजून रोज पतिसेवा करीत असे. कोणतेही व्रत असो ते पतिआज्ञेशिवाय तिने कधीही केले नाही. पतीला उद्वेग होईल असे ती केव्हाही वागली नाही. उलट पतिकार्याला नेहमी अनुसरत असे त्यामुळे त्यांच्या आनंदाचे ते मोठे स्थान होते. पतीच्या मनातील हेतू तिने जाणावा आणि काम आधीच करावे. त्यातच आपण कृतार्थ आहे असे तिला वाटे. केव्हाही तिचे अंत:करण दुश्चित नसे. सदा प्रसन्न व हसतमुख अशीच पतीपुढे वावरत असे.

**कलौ धन्या सुमान्या च नैवान्यत्रापि दृश्यते ।।**
**सवषां भासते नूनमवतीर्णा रमैव सा ।। ४७ ।।**

कलियुगामध्ये अशी धन्य, सदा पवित्र आचरण करणारी सर्वमान्य सती अन्यत्र दिसणे प्राय: कठीण आहे. कारण या कलियुगात चांगल्या लोकांनादेखील दुर्बुद्धी होते. पण अहल्यादेवी मात्र या भूलोकी श्रीविष्णुपत्नी रमा (लक्ष्मी) च अवतरली की काय असेच सर्व लोकांना वाटत होते.

**उभौ तौ दंपती दत्त दत्त चितौ मुदान्वितौ ।।**
**चक्रलुः परमां भक्तिं सौत्सुक्यं हि परेशितुः ।।४८ ।।**

अशा श्रीलक्ष्मीनारायणासारख्या या जोडीने म्हणजे श्री अहल्यादेवी व लक्ष्मण दीक्षित पति-पत्नींनी आपल्या सर्व चित्तवृत्ती श्रीदत्तचरणकमली लीन केल्या आणि मोठ्या प्रेमाने व उत्सुकतेने श्रीदत्तप्रभूची परमभक्तिभावाने सेवा केली. म्हणूनच त्यांच्या उदरी श्रीदत्तगुरूंनी जन्म घेतला. परमात्मादेखील शुद्ध भूमी पाहिल्याशिवाय अवतार घेण्याचे निश्चित करीत नाही.

**ततः स्वल्पेन कालेन दत्तात्रेयो दिगंबरः ।।**
**विचारयामास हृदि स्वावतारप्रयोजनम् ।। ४९ ।।**

यानंतर थोड्याच कालाने श्रीदत्तदिगंबर देवाने विचार केला. आता अशा या घोर कलियुगात अवतार घेणे अतिशय आवश्यक आहे. त्याशिवाय लोकांची प्रवृत्ती सन्मार्गाकडे होणार नाही. साधूंचे परिपालन आणि दुष्टांचा नाश हा झाल्याखेरीज व्यवस्थित धर्माचरण कसे होईल ? धर्माचरण योग्य झाल्याशिवाय जग-कल्याण होणे शक्य नाही. म्हणून आपण हरी निर्विकार आहो तरीपण मायेचा स्वीकार करून अवतार धारण करण्याला ही संधी उत्तम आहे.

**दत्तोवरः पूर्वजपूरूषाय ।**
**कुले भविष्यामि तवेति सत्यम् ।।**
**तं कर्तुकामोऽवितथप्रतिज्ञो -**
**जानामि दुःखं खलु गर्भगस्य ।। ५० ।।**

असा विचार करून श्रीदत्त भगवान मनात म्हणतात की - या दीक्षितश्रेष्ठाच्या पूर्वजाला-माझ्या परमप्रेमी भक्ताला प्रसन्न होऊन वर दिला आहे. तो म्हणजे मी तुझ्या कुलात जन्म (अवतार) घेईन. तो वर खरा केला पाहिते. कारण मी सत्य-प्रतिज्ञ, बोलल्याप्रमाणे करणारा असाच आहे. म्हणून जीवाला गर्भवासाचे प्रखर दु:ख कसे होते, भोगावे लागते, ते मायेचा स्वीकार करून लौकिक दृष्टीने मलाही समजून घेतले पाहिजे. यासाठी या अतिपवित्र अहल्यासतीचे उदरी जन्म घेतला पाहिजे. याशिवाय अन्य मार्ग नाही. त्यामुळे जगताचा उद्धार व दीक्षितांचा संसार दु:खपरिहार आणि माझे वचन परिपालन केल्याचा आनंद हे सर्व साधेल.

**निर्विकारोऽपि साकारो भूत्वा रक्षामि स्थानिह ।।**
**इतिमत्वा प्रभुर्भूयश्चिंतयामास सत्वरम् ।। ५१ ।।**

सच्चिदानंद श्रीप्रभु मूळचे निर्गुण व निर्विकारच आहेत. तरी पण ते मायोपाधीने आपल्या भक्तप्रेमाने वेडे होऊन सगुण साकार झाले. त्यांना आपल्या भक्तांना दोन हातांनीच आलिंगन देऊन जो आनंद झाला, तो पूर्ण झाला नाही, अपुरा पडला. म्हणून भगवान चतुर्भूज झाले. केवढे हे भक्तप्रेम! आणि आपल्या आत्यंतिक भक्ताचे रक्षण केले पाहिजे असे त्यांनी मनात आणले. याप्रमाणे स्वभक्त रक्षण व त्याची मनोरथपूर्णता कशी करावी, या विचारात श्रीदत्तमहाराज निमग्न झाले. कोणत्या प्रकारे हे कार्य होईल असा विचार करू लागले.

**नास्ति मत्सदृश: कोऽपिदयादाक्षिण्ययुक्पुमान् ।।**
**इति निश्चित्य दत्तोऽपि सतीगर्भगतो ह्यभूत् ।। ५२ ।।**

मी स्वत: अद्वितीय आहे. मग माझ्यासारखा दुसरा परमपुरूष कसा मिळणार ? माझ्यासारखे दयादाक्षिण्यादी सद् गुण कोणाजवळ सापडणार ? हे सर्वथा अशक्य आहे. मनुष्य आपण सर्वगुणसंपन्न आहो, माझ्यासारख्या रूपवान् व संपत्तिमान् कोण आहे असा दुरभिमानी असतो. तो त्यांचा अविचार. केवळ सर्वगुणसंपन्न, सर्व सौंदर्यवान्, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् एक परमेश्वर आहे असा विचार करून श्रीदत्तप्रभू त्या अहल्यासतीचे उदरात गर्भरूपाने आविर्भुत झाले.

**अंतर्वत्नी शुभासाऽभुद्गर्भलक्षणलक्षिता ।।**
**तेजस्विनी बभौ देवी सुमंदा गृहकर्मसु ।।५३ ।।**

नंतर दीक्षितपत्नी साध्वी अहिल्यादेवी गर्भवतीच्या सर्व लक्षणांनी शोभू लागली. सामान्य गर्भवतीपेक्षा ती तेजस्वी दिसू लागली. सूर्य व चंद्र यांनाही तेज ज्यांच्यापासून प्राप्त होते तो, परमात्मा उदरात होता. मग का बरे विशेष तेज दिसणार नाही ? पूर्वीसारखी तिला घरातील सर्व कामे करता येईनात. चालणे सावकाश, मंद झाले. पण आनंद मात्र परिपूर्ण होता. नेहमी हसतमुख आणि आनंदी दिसे. कारण सच्चिदानंदच उदरात होते.

**संस्कारान् विदधे विप्रो गर्भक्षणकारकान् ।।**

**यथाविधि विधिज्ञैश्च साकं सर्वान् विधिप्रिय: ।।५४।।**

श्री. दीक्षित द्विजाने निश्चित, स्थिर गर्भचिन्हे पाहून द्विजातीला योग्य असे सर्व गर्भसंस्कार यथाविधी केले. संस्कार हे गर्भाची शुद्धी, गर्भाचे रक्षणासाठीच असतात. संस्कार करतेवेळी योग्य शास्त्रविधी जाणणारे ज्ञाते, वैदिक व शास्त्री यांना बोलविले होते. सर्व संस्कार यथाविधी झाले. त्यामुळे अहिल्यादेवी खरोखर देवतेप्रमाणे शोभू लागली. सर्व लोकांनी कौतुक केले. सर्वांना आनंद झाला.

**स्वयंसंस्कारहीनोऽपि गर्भगोऽत्रिसुत: प्रभु: ।।**

**संस्कारान्स्वीचकाराऽसौ भक्तधीनोहि सद्गुरू: ।।५५।।**

श्रीदत्तप्रभू स्वत: संस्कारहीन होते. त्यांना संस्काराची गरजच नव्हती, कारण ते विधिनिषेधातीत आहेत. केवळ भक्तासाठीच त्यांनी धर्म स्वीकारला. मग त्यांनी केलेल्या संस्काराचा स्वीकार भक्ताची इच्छा पूर्ण करण्यासाठी करणेच भाग आहे. म्हणूनच त्यांनी त्यांचा आदर केला.श्रीदत्तप्रभूच्या सर्व लीला आपल्या प्रिय भक्ताकरताच असतात. संसारी जिवांप्रमाणेच सुखद:ख हे आपणाला असल्याचे भासवितात परंतु त्यांना ते असत नाही. त्यांच्या पलीकडे ते असतात.

**यथाकालं समुद्भूतान् गर्भगस्योचितानथ ।।**

**तदानीं पूरयामास दोहदान् द्विजसत्तम: ।।५६।।**

योग्य वेळेला श्रीअहल्यादेवीला डोहाळे लागले ते सामान्य स्त्रियांप्रमाणे काहीतरीच नव्हते, उचित असेच होते. सर्व डोहाळे श्री दत्तउपासनेला शोभणारे होते. त्या डोहाळ्यांची त्या त्या वेळी काळजी घेऊन श्रीदीक्षितांनी पूर्णता केली. संस्कार जसे आवश्यकच आहेच त्याप्रमाणे डोहाळेही पूर्ण करणे जरूर असते. श्री अहिल्यादेवीचे लक्ष देवाधर्माकडे पूर्वी होतेच; आता विशेष प्रकाराने देवपूजा बराच वेळ करीत बसणे, ध्यान करीतही पुष्कळ वेळ निवांत बसणे अशा प्रकारच्या डोहाळ्याचेही पण दीक्षितांना विशेष असे काहीच वाटले नाही.

**ब्रह्मज्ञानं श्रुत्वा भार्यामुखपंकजाद्विनिर्जातम् ।।**

**आश्चर्यभीतियुक्तो मनुतेऽयं भूतसंचार: ।। ५७।।**

श्रीअहल्यादेवीचे सर्व डोहाळे दीक्षितश्रेष्ठांनी पूर्ण केले. संचार ते सर्व लौकिकच होते. ते पूर्ण करण्यात त्यांना आनंदच झाला. पण जेव्हा आपल्या पत्नीच्या मुखातून ब्रह्मज्ञानाची चर्चा म्हणजे ब्रह्म सत्य आहे. जग मिथ्या खोटे आहे. जीव हा साक्षात् ब्रह्मरूप आहे. अशी आणि शास्त्रांची माहिती, उपासनेविषयी सविस्तर चर्चा, कर्मकाण्डाविषयी भाषण अशी गहन विषयाची मीमांसा मुखाबाहेर पडू लागली. तेव्हा मात्र, श्री. दीक्षितांना भीती वाटू लागली. आपली स्त्री बुद्धीला आकलन होणारे विषय बोलत नाही. त्याअर्थी कोणातरी विद्वान पिशाच्चाने हिला पछाडले आहे. हा भूतसंचार आहे असे वाटले आणि फारच भयभीत झाले.

**ज्ञात्वा मन:स्थिति तां दत्तो ब्रूते न भूतबाधेयम् ।।**
**गर्भप्रविष्टभूतं विष्णुं मां भक्तराज ! जानीहि ।।५८।।**

त्या दीक्षितश्रेष्ठांना भूतबाधेची शंका आली. आणि ते विषण्ण झाले. ती त्यांची अवस्था पाहून उदरात गर्भरूपाने असलेले श्रीदत्तगुरू, श्री. दीक्षितांचा संशय दूर करण्यासाठी बोलू लागले. हे भक्तश्रेष्ठ ! तुला भूतबाधा आहे असे वाटते काय ? पण असे तू मनातसुध्दा आणू नको. मग हे कोण बोलते हे समजावून घेण्याची इच्छा आहे? असल्यास सांगतो, ऐक-तुझ्या पूर्वजाला-माझ्या परमभक्ताला मी तुझ्या वंशात जन्म घेतो असे वरप्रदान दिले होते. ते खरे करण्यासाठी या साध्वीचे उदरात गर्भरूपाने आलो. मीच सर्व बोलतो. तर हा भूतसंचार नाही. भूतांचा नाथ श्रीदत्त याचा संचार आहे. म्हणून भय बाळगण्याचे कारण नाही. हे विप्रश्रेष्ठ ! शांत राहा.

**नवमासेष्वतीतेषु ह्यासन्नप्रसवा यदा ।।**
**आसीत्सुशोभन: कालो जगदाल्हाददायक: ।।५९।।**

श्रीसती अहल्यादेवीला नऊ महिने पूर्ण झाले. आणि तिचा प्रसूतिकाल जवळ आला. त्या वेळी श्रीदत्तप्रभूंनी मनात विचार केला. आपण शुभकालीच जन्म घ्यावयास पाहिजे. कारण ईश्वराला जन्मस्वाधीनता आहे, तशी जिवांना नाही. देवाला वाटेल त्या वेळी प्रकट होता येते. भक्त प्रल्हादाने या खाबांत भगवान आहेत असे स्तंभाकडे बोट करून म्हणताच तत्काळ नृसिंह अवतार झाला. परमेश्वराने जो अवताराचा दिवस ठरविला, तो दिवस सर्व लोकांना तर अत्यंत आनंद देणारा असाच होता. त्या दिवशी सर्व जग आनंदात होते.

**उष्णकालेऽपि सद्भानुस्तापदोहि नृणां तदा ।।**
**द्रुमा: फुल्लादिश: सर्वा: प्रसन्नमुखपंकजा: ।।६०।।**

श्रीशजन्माच्या वेळी भूतलावर उष्णकाल-उन्हाळा होता. सूर्याचा ताप अधिक असावयाचा परंतु तोदेखील त्या वेळी तापदायक नव्हता. सर्व वृक्षवेली प्रफुल्ल फुललेल्या होत्या. सर्व दिशा कशा प्रसन्न होत्या. सर्व लोकांच्या मुखकमलावर प्रसन्नता दिसत होती. सर्वांच्या मनात नवीन उत्साह निर्माण झाला आणि जनता कशी आनंदित होती !

**सजलजलवृन्दो मंदमेव प्रयाति ।**
**किरति च वनमल्पं मंदमंदं जगर्ज ।।**
**प्रवहति पवमान: पाटलामोदचोर: ।**

**प्रभवति परमेशे भक्तनष्टार्तिधीशे ।।६१।।**

आकाशात सजल मेघपंक्ती मंद गतीने चालल्या होत्या. थोडी थोडी पर्जन्यवृष्टी चालू होती, मेघगर्जना पण कर्णमधुरच होती. पाटल पुष्पगंध असलेला वारा मंद वाहात होता. श्रीप्रभुरायाचा अवतार सर्व भक्तजनांच्या पीडा नष्ट करण्याकरताच होणार होता. म्हणूनच प्रसाद लक्षणे अगोदरच दिसू लागली. या सुमंगल समयी सर्व पंचमहाभूतांनी आपापल्या परी श्रीगुरूदत्त सेवेला आरंभ केला.

**वसुवसुमुनिभूशाके मधुमासे पक्षतौ दिने रम्ये ।**
**यामे द्वितीयसंज्ञे संजज्ञेऽसौ दयाघनोदत्तः ।।६२।।**

अशा सुमधुर वेळी श्री. दीक्षितश्रेष्ठांच्या घरी शके १७८८ चैत्र शुध्द प्रतिपदा दुपारी बारा वाजता श्रीकृष्णावेणी पंचगंगा तीरनिवासी श्रीदत्तमहाराजांचा जन्म झाला. ग्रामस्थ लोकांना आनंद झाला. मंगल वाद्ये वाजू लागली. सर्वत्र साखर वाटली. श्रीप्रभुराजांनी जन्माचा दिवस किती सुमंगल शोधून काढला ! त्यादिवशी वर्ष-प्रतिपदा-गुढी पाडवा होता. त्यातच श्रींचा जन्म ! मग घरोघरी गुढ्या तोरणे शोभत होती. सुंदर वस्त्रे परिधान केलेल्या लोकांचे फिरणे चालले होते. दोन्ही आनंद एकाच वेळी झाल्यामुळे सर्व नृसिंहवाडी आनंदाने फुलून गेली होती.

**जातकर्माकरोद्विप्रो विधिद्रष्टे न कर्मणा ।।**
**वर्मभूतस्य तत्कर्म जगतामास शर्मकृत् ।।६३।।**

नंतर श्री. दीक्षितश्रेष्ठांनी त्या आपल्या सर्वसुदंर मुलाचे जातकर्मादी धार्मिक संस्कार यथाशास्त्र व्यवस्थितपणे केले. सर्व जगताचे रक्षण करण्यासाठी ज्यांचा अवतार त्यांच्या रक्षणासाठी केलेले संस्कार जगाला कल्याणप्रद होतात. यात संशय नाही. त्यांचे रक्षण म्हणजे जगाचे रक्षण होय.

**नर्ययनं यस्मात्तं बालं नारायणाभिधं चक्रे ।।**
**नक्रे यद्वत्हृदयं स्वीये तद्वद्दर्शभूचक्रे ।।६४।।**

गजेंद्रमोक्षाचे वेळी तो गजेंद्र भक्तिभावाने शरण आला. मनात ध्यान केले आणि मनानेच स्तुती केली.कारण गजजन्म असल्याने याशिवाय अन्य साधनच नव्हते. त्याची हाक ऐकताच श्रीभगवान अतिशय वेगाने लागलीच तेथे धावुन आले व गजेंद्राचा उद्धार केला. प्रभू येताक्षणी देहाने नमन शक्य नव्हते तरीही "नारायणाखिल गुरो भगवन्नमस्ते" असे तो म्हणाला आणि शुंडेने कमल घेऊन देवाला वाहिले. असा तो परमभक्त होता. म्हणूनच त्या देवांनी तत्काळ त्याचा उद्धार केला. त्याबरोबरच आपल्या भक्ताला सर्वांविषयी समता धारण करतात. त्याप्रमाणे या बालकाने पुढील आयुष्यात जे विरोधी होते,

त्यांच्यावरदेखील दयार्द्र दृष्टीच ठेवली. मग भक्तावर ठेवली यात काय आश्चर्य ! श्री लक्ष्मण दीक्षितांनी नामकरण संस्कारसमयी सर्वांचे ठायी जीवरूपाने वास्तव्य करणाऱ्या भगवंताचे ते अवतार असल्यामुळे मुलाचे नाव नारायण असे ठेविले. हे नाव सार्थच होते. यानंतर नारायण दीक्षित या नावानेच ते सर्व गावात प्रसिद्धीस आले. त्या बालकाच्या बाललीला पाहून श्री. लक्ष्मण दीक्षित व श्री अहल्यादेवी हे आनंदित झालेच त्या बरोबर ग्रामस्थही आनंदित झाले.

**गर्भाष्टमे वत्सरे च व्रतबंधं चकार सः ।।**
**द्विजो द्विजत्वसंसिध्यै विधिना विधिजस्यहि ।।६५।।**

गर्भाचे वर्ष धरून आठवे वर्षी मुलाचा उपनयन संस्कार श्री. दीक्षितश्रेष्ठांनी केला. ब्राह्मण कुमाराचे उपनयन-मौंजीबंधन करावे. असे अश्वलायन सूत्रकारांनी लिहिले आहे. ब्राह्मण कुमारास उपनयन संस्कार झाल्यानंतरच द्विजत्व प्राप्त होते. " **संस्कारात द्विज उच्यते** " असे स्मृतिवचन आहे. " **द्विर्जातो द्विज** : " दोन वेळ जन्म घेतो म्हणूनच त्याला द्विज म्हणतात. पहिल्याप्रथम मातेपासून जन्म होतो व दुसऱ्या वेळी संस्कार झाला म्हणजे होतो. म्हणून द्विजत्व प्राप्त होण्यासाठी श्रुती ज्याच्या मुखातून जन्मल्या आणि ब्रह्मदेवाला ज्यांनी दिला. त्या बालकरूपी ईश्वराचा व्रतबंध संस्कार त्यांनी केला.

**ततार वेदशास्त्राब्धि लीलयासौ मुदान्वितः ।।**
**लोकसंग्रहमेवात्र कर्तुकामो जजानह ।।६६।।**

उपनयन झाल्यानंतर पूर्वीचे प्राथमिक अल्पकाळात पूर्ण करून आंग्लभाषाज्ञान संपादन करण्यास प्रारंभ केला. थोड्याच कालात त्याचा त्यांना वीट आला. आणि श्रीक्षेत्री येऊन खऱ्या अभ्यासाला आरंभ झाला. त्यापूर्वी नारायण दीक्षित शिक्षणासाठी परगावी होते. वेदशास्त्राचा सांगोपांग अभ्यास केला. अध्ययन यथाविधी चालू होतेच. त्याप्रमाणे अग्निकार्य, संध्योपासनादी नित्यकर्मानुष्ठान आणि यथाशास्त्र ब्रह्मचर्यपरिपालन, श्रीदत्तदेवार्चन इत्यादी ब्रह्मचर्याश्रमाने सर्व नियम काटेकोरपणे पालन करीत होते. तेही मोठ्या आनंदाने कर्तव्य म्हणूनच. श्री. नारायण दीक्षित श्रीदत्तावतारच होते ! सर्व लोकांना वर्णधर्म व आश्रमधर्म परिपालन करण्याचे वळण लागावे. यासाठीच त्यांचे वर्णाश्रम धर्मपरिपालन अनुष्ठान होते. जसे श्रेष्ठ लोक वागतात, तसेच बाकीचे लोक वागू लागतातच. याकरता तर ते अवतरले होते.

**ततो गार्हस्थ्यमकरोदग्निसेवनपूर्वकम् ।।**
**कर्मबंधनमुक्तस्य किं करोति हि चोदना ।।६७।।**

श्री. नारायण दीक्षित श्रीदत्तअवतारी पुरूष होते. त्यांना चोदना लक्षण धर्माचरणाची गरजच नाही. तरीपण लोकव्यवहार व शास्त्राज्ञा ही पाळलीच पाहिजे. यासाठी कर्मबंधनाचा स्वीकार केला. योग्य वेळी त्यांनी पवित्र कुलातील व सत्त्वगुणी वधूचे पाणिग्रहण केले.

श्री. नारायण दीक्षित आता गृहस्थाश्रमी झाले. अनुकूल, पतिव्रता धर्मानुसारिणी, लाभली. दंपतीधर्माचरणाला आरंभ झाला. पूर्वीचे सर्व आचरण नियमाने चाललेच होते. आता स्मार्ताग्निसेवा चालू झाली.

**प्रजा: संपाद्य विधिवदुदासीनी दृढव्रती ।।**
**विषयान्बुभुजे नित्यं यथाशास्त्रमनिंदित: ।।६८।।**

ऋणत्रयातून मुक्ततेसाठी श्री. नारायण दीक्षितांचे धर्मपत्नीचे ठायी प्रजोत्पत्ती पण झाली. सर्व काही व्यवस्थित चालले होते. पण संसारात आसक्ती नव्हती, अशाच स्थितीत सर्व गृहस्थधर्माचरण चालले होते. स्मार्ताग्निसेवा, अतिथि-सत्कार आणि पंचमहायज्ञ, श्रीदत्तसेवा सर्व चाले. पण सर्वंच यथाशास्त्र आणि अनिंदित असेच आचरण श्री. नारायण दीक्षितांनी केले.

**अयाचिताद्दीनि व्रतानि सम्यक् ।**
**आचारवान्संकुरूते दृढव्रत: ।।**
**दत्तार्चनं चापि करोति प्रेम्णा ।**
**वैराग्यशीलोऽविरतं स्वभावत: ।।६९।।**

श्री. नारायण दीक्षितांनी वर्णाश्रम धर्मानृष्ठान आस्थेने चालू ठेविले होते. पुढे अयाचितवृत्ती ठेविली. कोणीकडे काहीही मागावयाचे नाही. मिळेल त्यातच यातच आनंदाने निर्वाह करावयाचा यालाच अयाचित वृत्ती म्हणतात. चांद्रायण व्रतही काही दिवस केले. शुक्ल प्रतिपदेला एक घास, द्वितीयेला दोन घास अशा क्रमाने पौणिमेस पंधरा घास घ्यावयाचे. आणि पुन: कृष्णप्रतिपदेस एक एक घास कमी कमी करीतच अमावास्येला एक घास घ्यावयाचा याला चांद्रायण व्रत म्हणतात. अशी खडतर व्रते पण केली. श्रीदत्त उपासना मोठ्या प्रेमाने चालू होतीच, अंगी परम वैराग्य जरी होते तरीही ईश्वरभक्तीची अभिलाषा होती.

**अथस्तोकेन कालेन जिज्ञासु: पारमार्थिकम् ।।**
**ज्ञानं चाप्यनुभावं तं जगाम गुरूसन्निधिम् ।।७० ।।**

नंतर थोड्याच कालाने श्री. नारायण दीक्षितांना जन्ममरणातून सोडविणारे पारमार्थिक ज्ञान आणि त्याचा अनुभव यावा, यासाठी सारखी तळमळ लागली. **श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती-टेंबेस्वामीमहाराज** त्यावेळी नृसिंहवाडीतच होते. मग काय ! तत्काळ श्री. नारायण दीक्षित हे त्यांच्याकडे गेले. त्याना अनन्यशरण गेले. दुधात साखर पडली. रत्नबरोबर कोंदणात बसले. श्री नारायण दीक्षितांची वृत्ती पाहून श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती-थोरले महाराज यांना फारच आनंद झाला. त्यांनी त्यांना अतियोग्य असे मार्गदर्शन केले. श्री. नारायण दीक्षितांनाही पण पाहिजे होते तेच मिळाले. आनंद झाला.

**संन्यासमकरोत्तीव्रे तारूण्येऽपि मुदान्वित: ।।**
**तथापि न्यूनं मनुते दंडाभावं स योगिराट् ।।७१ ।।**

श्री टेंबेस्वामी महाराजांनी श्री. नारायण दीक्षितांना सन्मार्गदर्शन आणि शिक्षणही दिले. आणि ते भक्तोद्धारासाठी वाडीत काही दिवस राहून क्षेत्रपर्यटनार्थ निघून गेले. त्या अवधीत श्री. नारायण दीक्षितांची वैराग्यपूर्ण भूमिका तयार झाली. श्री.नारायण दीक्षितांची साध्वी सहधर्मचारिणी पण परब्रह्मात लीन झाली. आता भार्यानुज्ञेची गरजच नव्हती. म्हणून श्री. नारायण दीक्षितांनी ऐन तारूण्यातच संन्यास घेतला. आता श्री. नारायण दीक्षित चतुर्थाश्रमी संन्यासी झाले. ज्या वेळी पूर्ण वैराग्य होईल त्याच वेळी संन्यास ग्रहण करावा असे शास्त्रवचन आहे. म्हणून वानप्रस्थ आश्रममोल्लंघनाचा श्री. दीक्षितांना दोष येत नाही. तरीसुद्धा दंडाशिवाय या संन्यासाश्रमाची पूर्णता नाही. ती पूर्णता व्हावी अशी सारखी तळमळ त्यांना लागली.

**भक्तचिंतामणिर्दत: स्वांतं संलक्ष्य तस्य तत् ।।**
**अप्रैषयद्गुरूं स: श्रीवासुदेवसरस्वतीम् ।।७२ ।।**

ज्यांनी आपल्याला योग्य मार्ग दाखविला. त्यांच्याकडूनच म्हणजे श्री.प. प. श्रीवासुदेसुवानंद सरस्वती-टेंबेस्वामी महाराज यांचेपासून दंड मिळावा, अशी श्री. दीक्षितमहाराजांची उत्कट इच्छा होती. ती पूर्ण व्हावी यासाठी श्री दत्तगुरूंची खडतर सेवा आरंभिली. थोड्याच कालात श्रीप्रभू संतुष्ट झाले. आणि आपल्या परमभक्ताची मनीषा पूर्ण करण्यासाठी श्रीटेंबेस्वामी महाराजांना श्रीनरसोबावाडीला येण्याविषयी श्रीदत्तमहाराजांनी आज्ञा केली.

**आगतं सद्‌गुरूं वीक्ष्य चानन्यशरणोऽभवत् ।।**
**तथाविधं तु सच्छिष्यं ज्ञात्वाऽस्निह्यत्तदागुरू: ।।७३।।**

श्रीदत्तमहाराजांची आज्ञा होताक्षणी श्रीटेंबेस्वामीमहाराज श्रीक्षेत्र नरसोबावाडीला आले. सर्वांना अत्यंत आनंद झाला. श्रीदीक्षितमहाराजांचा तर आनंद गगनात मावेना. ते तत्काळ त्यांचे दर्शनाला गेले. त्यांचे चरणी शिष्याला पाहून श्रीटेंबेस्वामीमहाराज कळवळले आणि श्री. दीक्षितमहाराजांचे वर दयापूर्ण दृष्टीने कृपा केली.

**दण्डदानप्रसंगे श्रीवासुदेवयतीश्वर: ।।**
**गृहीत्वाऽऽज्ञां दत्तगुरोरनुजग्राह भक्तित: ।।७४।।**

एकदा श्री. दीक्षितमहाराजांनी श्रीगुरूमहाराजांना मोठ्या प्रेमाने प्रार्थना केली. श्रीगुरूमहाराज ! मला आपण दंड द्या. दंडाशिवाय आश्रमाची पूर्णता नाही. आपल्यावाचून मी दंड घेणार नाही. माझ्यावर कृपा करा. असे प्रेमाने परोपरी विनविले. श्रीगुरूमहाराजांनी त्यांना सांगितले. अहो स्वामी ! मी श्रीदत्तमहाराजांचे आज्ञेशिवाय काहीच करू शकत नाही. त्यांचे आज्ञेवाचून मला दंड देता येणार नाही. श्रीगुरूवचन ऐकताच श्री. दीक्षितमहाराजांना फार वाईट वाटले. त्यांच्या डोळ्यातून सारखा अश्रुपूर वाहू लागला. रात्री झोपदेखील आली नाही. सारखे तळमळत होते. मग काय चमत्कार, पहाटे श्रीदत्तमहाराजांनी श्रीटेंबेस्वामीमहाराजांना आज्ञा दिली की 'स्वामींना दंड द्या.दीक्षितस्वामीमहाराज माझे आवडते परमभक्त आहेत.'

अशी आज्ञा होताच श्रीटेंबे स्वामीमहाराजांनी श्री दीक्षितस्वामीसमीप स्वत: येऊन सांगितले, 'स्वामी ! आताच दंडग्रहणाची तयारी करा.' हे श्रीगुरूवाक्य ऐकताच त्यांना फार समाधान झाले. तत्काळ दंडग्रहणाची सर्व तयारी झाली आणि यथाविधी श्रीगुरू श्रीटेंबेमहाराजांनी त्यांना दंड दिला व आपल्या प्रिय शिष्यावर अनुग्रह केला. श्री. दीक्षित स्वामीं यांना प. प. श्रीनृसिंहसरस्वती दीक्षितस्वामी महाराज असे नाव मिळाले. आणि त्यांना श्री टेंबेमहाराजांनी आज्ञा केली. तुझी वाडी सोडून कुठेही जावयाचे नाही. आणि रोज रात्री पालखी झाल्यानंतर श्रीउत्सवमूर्तीची पूजा व शेजारती करावयाची इतके करून वाडीतच राहावयाचे.

**मन्यमान: पुण्यकृतमात्मानं मुमुदे तदा ।।**
**गुरोराज्ञां पुरस्कृत्य कृतवान्दत्तसेवनम् ।।७५।।**

दंडग्रहणानंतर श्री. दीक्षित महाराजांना फार मोठी धन्यता वाटली. आपण आता कृतार्थ झालो असे ते म्हणाले. आनंद झाला. ते श्रीगुरूंचे आज्ञेप्रमाणे नियमाने श्रीउत्सवमूर्तीचे पूजन करीत असत. तो

नियम वाडी सोडीपर्यंत त्यांनी मोडला नाही. आश्रमधर्माचे अनुष्ठान व्यवस्थित यथाविधी करीत होतेच. आपल्या सदाचरणाने आणि तपश्चर्येने ते वाडीमध्ये पूज्य व मान्य झाले. श्रीटेंबेमहाराजांचा मुक्काम त्या वेळी या वाडीक्षेत्रात होता. नंतर त्यांनी अन्य क्षेत्री जावयाचे असे श्रीदत्तआज्ञेने ठरविले. त्या वेळी सर्व क्षेत्रस्थांना आपल्यापुढे बोलावून प्रेमळपणाने सांगितले की हे श्रीनृसिहसरस्वती-दीक्षित स्वामीमहाराज म्हणजे मीच आहे. यांच्याबद्दल अन्य भावना ठेवू नका. त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागा. माझ्यापेक्षाही हे काकणभर अधिक आहेत याबद्दल मनात शंका बाळगू नका. त्यांच्या आज्ञेत वागण्यात तुम्हा सर्वांचे कल्याण आहे. केव्हाही त्यांना उद्वेग होईल असे वर्तन करू नका.' असे सर्व क्षेत्रवासी पुजारी मंडळींना प्रेमाने सांगितले आणि आपण तीर्थाटनाला गेले.

**अथ स्थानत्यागहेतुं कंचिदालक्ष्य सत्प्रियः ।।**
**चलच्चित्तोऽभवत्किंचिद्गुर्वाज्ञा पालनेऽक्षमः ।।७६।।**

श्रीदीक्षितमहाराजांचा वर्तनक्रम आपल्या श्रीगुरूंच्या आज्ञेप्रमाणे व्यवस्थित चालू होता. श्री. टेंबेस्वामीमहाराजांची सर्व हितकारक आज्ञा आणि श्री. दीक्षित महाराजांचे व्यक्तिमत्त्व या दोन्ही कारणांनीही सर्व क्षेत्रस्थ पुजारी त्यांना मान देत. त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागत. त्यांना उद्वेगकारक असे वर्तन करीत नसत.

असा काही काल गेला. पुढे पुढे बाहेरगावी असलेल्या भक्तांच्या सुदैवाने किवा क्षेत्रातील लोकांच्या दुर्दैवाने क्षेत्रस्थ पुजारी श्रीटेंबेस्वामीमहाराजांची आज्ञा पालन करीनासे झाले. श्री. दीक्षित स्वामीमहाराजांचा मान ठेवीनासे झाले. त्यानंतर त्यांना ते वाटेल तसे बोलू लागले. उघड अपमान होऊ लागला. तुम्ही येथून निघून जा, असेही सांगितले. त्या वेळी श्री. दीक्षितमहाराजांना फार दुःख झाले. कारण गुरूंच्या आज्ञेप्रमाणे तेथे राहावे तर लोकांचा उपद्रव होतो. राहावे तर श्रीगुरूंच्या आज्ञेचे उल्लंघन होते. त्यामुळे चित्त अस्थिर झाले. काय करावे ते समजेना. शेवटी उपोषण करून श्रीदत्तउपासनेला आरंभ केला. 'श्रीगुरो ! दत्त प्रभो ! आपण आता मला मार्गदर्शन करा.' असे म्हणत ते श्रीचरणी अनन्य शरण झाले.

**कार्यं किमपि निश्चित्य जहर्ष खलु योगिराट् ।।**
**जग्राह सहसाऽऽज्ञां तु श्रीदत्तस्य तपस्य या ।।७७।।**

श्रीदत्तोपासनामार्गाचा प्रसार, आणि श्रीदत्तभक्तांचा उद्धार, सर्वत्र सद्धामंसंस्थापना इत्यादी कार्ये आता करणे आपले कर्तव्य आहे. श्री. दीक्षितमहाराजांनी असा मनाचा निश्चय केला. नित्य श्रीगुरूदत्तसेवा होती. त्यापेक्षा अधिक प्रमाणात ते आनंदाने करू लागले. एक प्रकारचा सात्त्विक आनंद

श्री. दीक्षित महाराजांना झाला. मग काय ! मौन धारण केले. सर्व लक्ष श्रीदत्तचरणी ठेविले. तीव्र तपश्चर्यारंभ झाला. त्यामुळे परमात्मा संतुष्ट झाले. मुलाचा हट्ट देवाला पुरविलाच पाहिजे. एके दिवशी श्रीदत्तगुरूंनी वाडी सोडण्याविषयी आज्ञा दिली. आज्ञा होताच श्री दीक्षितमहाराजांना फार फार आनंद झाला. श्रीदत्ताज्ञा झाली ही आपल्या श्रीसद्गुरूंचीच आज्ञा आहे असे ते समजले. दुसरी गोष्ट या क्षेत्रातील पुजाऱ्यांनाही आपली उपाधी नको. आपले इच्छित कार्य करावयाचे असे श्री दीक्षितमहाराजांनी ठरविले.

**जगाम रम्यं श्रीक्षेत्रममराख्यपुरंप्रति ।।**
**बभौ समावृतोभक्तै: सनक्षत्रो यथा शशी ।।७८।।**

श्रीदत्तगुरूंची आज्ञा होताच त्याच दिवशी वाडीतील आपल्या सर्व भक्तांना दीक्षित महाराजांनी बरोबर घेतले. आपले देवही बरोबर घेतले. आणि श्रीदत्तमहाराजांना दंड प्रणाम केला. कंठ दाटून आला. त्याच स्थितीत ते नौकेत बसले, व घेवड्याच्या शेंगांची भाजी ज्या ठिकाणी श्रीदत्तांनी आवडीने खाल्ली आणि ब्राह्मणाला अपार धन दिले. त्या श्रीक्षेत्र अमरापूर या ( हल्ली औरवाड या नावाने प्रसिद्ध असलेल्या ) पुण्यक्षेत्री गेले. त्या वेळी नावेत श्री दीक्षितमहाराज स्वभक्तांसह नक्षत्रांनी युक्त चंद्र शोभावा तसे शोभले.

**तत्राऽमरेश्वरं देवं श्रीगणेशयुतं शिवम् ।।**
**योगिनीश्च गुरूं दत्तं स्थापयामास भक्तयुक् ।।७९।।**

**वासुदेवानंदपूर्वं सरस्वत्युत्तरंच स: ।।**
**पीठं ह्यस्थापयच्छ्रीघ्रं भक्तकामसुरद्रुम: ।।८०।।**

श्रीअमरापूर क्षेत्राला आले. सर्व गावात नवचैतन्य निर्माण झाले. "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" या नाममंत्राने सर्व गाव दुमदुमून गेले. सर्व ग्रामस्थांनी श्री दीक्षितमहाराजांचे दर्शन घेतले. श्रीमहाराजांनी कृपापूर्ण दृष्टीने सर्वांकडे पाहिले व गौरविले. लोकांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. सर्व लोक म्हणाले, "महाराज ! आम्ही आपल्या आगमनाने धन्य झालो. आपण आमचे हे खेडेगाव पवित्र केले. आनंद झाला. नेहमीच त्यांच्याभोवती भक्तगण असावयाचे. श्रीदत्तोत्सव, भंडारे सुरू झाले. श्रीमहाराजांचे हास्यमुख, गोड भाषण आणि प्रेमावलोकन यांनी सर्व गाव मंत्रमुग्ध झाले.

नंतर श्री दीक्षितमहाराजांनी श्रीअमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला. सुंदर मंदिर बांधले. त्या मंदिरात श्रीविघ्नहरगणपती, श्रीअमरेश्वरलिंग आणि षड्भुज बसलेली दत्तमूर्ती, चौसष्ट योगिनी

यांची स्थापना सुमुहूर्तावर केली. आणि "श्रीवासुदेवानंद सरस्वतीपीठ" पण स्थापन केले. आपले प्रासादिक देव तेथे ठेविले. श्रीटेंबेस्वामी महाराजांचे-आपल्या श्रीगुरूमहाराजांचे-हस्तलिखित सर्व ग्रंथही तेथेच ठेविले. आणि महाराज समाधानाने श्रीक्षेत्र अमरापुरी राहिले. अनेक भक्तांच्या सांसारिक यातना नष्ट केल्या. श्री. रामभाऊ कुलकर्ण्यांचे मुलास केवळ श्रीदत्ततीर्थ जीवदान दिले. श्रीपीठाचा कारभार योग्य प्रकारे चालावा अशी सुव्यवस्था केली.

**नृसिंहवटिकस्था ये तेषां दुर्दैवदोषत: ।।**
**वियोगोऽजनि हा दैव ! भाविदैन्यविसूचक: ।।८१।।**

श्री प. प. मद्वासुदेवानंदसरस्वती श्रीटेंबेस्वामीमहाराजांनी 'हे दीक्षितमहाराज माझे प्रतिबिंबच, किंबहुना माझ्यापेक्षा अधिक आहेत, त्यांना मुळीच उपाधी त्रास देऊ नका' असे सर्व ग्रामस्थ पुजाऱ्यांना त्यांच्याच हितासाठी फार प्रेमाने जातेवेळी सांगितले होते. तरीपण क्षेत्रस्थांच्या दुदैवाने त्यांना फारच त्यांनी दुखविले. हाय ! हाय ! म्हणूनच श्रीदीक्षितमहाराजांनी वाडी सोडली. हा क्षेत्रस्थांचा दैवदुविलासच यात शंका नाही. भावी कालात येणाऱ्या संकटाचे ते एक पूर्वचिन्ह होय. म्हणूनच काही ग्रामस्थांना अशी दुर्बुद्धी झाली.

**क्षेत्राणि तीर्थानि सुपुण्यदानि ।**
**चकार पूतानि च कारयित्वा ।।**
**जुगालयादीनि सुविश्रुमानि ।**
**समागमच्छ्रीपुरमेव सद्य: ।।८२।।**

श्रीअमरापूर क्षेत्रात श्री दीक्षितमहाराजांनी काही काल वास्तव्य केले. नंतर श्रीकृष्णावेणीच्या पवित्र प्रवाहातून नावेनेच तीरावर असलेल्या क्षेत्रे आणि तीर्थे यांचे यात्रेस आरंभ केला. पहिल्यांदा श्रीक्षेत्र जुगुळ येथे गेले. याला काशीक्षेत्र म्हणतात. त्रिस्थळी करावयाची म्हणजे प्रथम काशी म्हणून श्रीक्षेत्री त्रिस्थळी एका दिवसात दाखविली. ती त्रिस्थळी म्हणजे जुगुळ ही काशी, श्रीकृष्णावेणी पंचगंगा संगम हा प्रयाग आणि कोल्हापूर ही गया अशी आहे. श्री दीक्षितमहाराजांनी जुगुळ तीर्थयात्रा शिष्यांसह केली. तेथेच रात्री ११-१२ वाजण्याच्या वेळी श्रीमहाराजांना श्रीदत्तनैवेद्याला गोदुग्ध असावे असे वाटले. पण ते त्या वेळी कसे मिळणार ? पण चमत्कार असा की एका गाईला पाहून श्रीमहाराज म्हणाले, 'या गाईची धार काढा.' त्या गाईच्या मालकाने सांगितले, 'महाराज ! या गाईची धार आम्हीच दोन वेळा काढली आता ती दूध देणार नाही.' त्या वेळी श्री दीक्षितमहाराज म्हणाले 'आमच्या देवाला दूध पाहिजे. धार काढा.'

त्यांच्या तोंडातून असे अमृतवाक्य झाले. नंतर शिष्यागणासह श्रीखिद्रापूर यात्रा केली. स्नान, देवतापूजन करून श्रीचंद्रेश्वरपूजन केले. श्रीदिगंबरस्वामी समाधीदर्शन घेतले आणि श्रीयेडूरक्षेत्री गेले. तेथे तीर्थस्नान झाले. श्रीविरूपाक्षलिंग दर्शन-पूजन झाले. तेथील पुजाऱ्यानी श्री. दीक्षितमहाराजांना पाहिले आणि तो म्हणाला 'महाराज ! कालच मी स्वप्नात आपण या देवालयात देवाजवळ बसला आहा व पूजा करता असे पाहिले.' तेथील तीर्थयात्रा संपवून लोकसंग्रहार्थ यात्रा करून श्री दीक्षितमहाराज अमरापूर क्षेत्राला आले.

**क्षेत्राणि तीर्थानि तथा स्वभक्ता- ।**
**नुद्धर्तुकामो भजकप्रियोऽसौ ।।**
**नौकाग्रयानोऽखिलपूज्यमानो ।**
**निरस्तमानः खलु संप्रतस्थे ।।८३।।**

सर्व लोक ज्यांची पूजा करतात, भक्तांना परमप्रिय व भक्त ज्यांना फार आवडतात, सत्त्वगुणांची मूर्तीच आणि पाहताच सर्वांना जे आनंद देतात असे श्री दीक्षितमहाराज यांनी श्रीकृष्णावेणी व पंचगंगा यांच्या संगमावर स्नान केले. देवतांचे पूजन केले. आणि आपल्या भक्तगणांसह प्रयाग यात्रा पूर्ण केली व उत्तरेकडे असलेली क्षेत्रे व तीर्थे पवित्र करून भक्तांचा उद्धार करावा या हेतूने ते नौकेत बसले आणि गयायात्रेला भक्तांसह निघाले.

**शुक्लादीनि सुपुण्यानि गणेशस्य च वाटिकाम् ।।**
**समीक्ष्य तु समापूज्य स्नात्वाऽगादंबिकापुरम् ।।८४।।**

प्रथमतः शुक्लतीर्थादी अष्टतीर्थे केली. त्या त्या तीर्थावर स्नान, देवतापूजन यथोक्त केले. आणि नावेतूनच गयेच्या यात्रेला निघाले. सर्व भक्तगण नावेत बसले. श्री महाराजांचे देव नावेत शोभू लागले. सर्व भक्तगणांत श्री महाराज सुहास्यमुख, प्रेमार्द्रदृष्टीने अवलोकन करणारे शोभत होते. त्यांच्याकडे पाहताच भक्तांचा आनंद वाढत होता. "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" या नाम-मंत्राचा घोष अखंड चालला होता. सर्व आसमंतात नामघोष निनादून राहिला. त्या सोहळ्याचे वर्णन करणे अशक्य आहे.

अशा प्रकारे नौका उत्तरेला प्रवाहाच्या उलट दिशेला चालली. सारखा नाममंत्र गजर चालला होता. श्रीकृष्णावेणीतीरी असलेल्या प्रत्येक गावचे लोक येऊन श्री दीक्षितमहाराजांची पूजा व आरती करीत होते. क्रमाने ती नाव श्रीक्षेत्र गणेशवाडीला आली. श्रीमहाराज भक्तगणांसह तेथे नावेतून उतरले. श्रीकृष्णावेणी स्नान सर्वांसह झाले. श्रीविघ्नहर गणेशपूजन फारच थाटाने झाले. श्रीला नैवेद्य समर्पण

केला. गावकऱ्यांनी अत्यादराने श्री दीक्षितमहाराजांचा सत्कार व पूजन केले. पुन: श्रीमहाराज शिष्यगणांसह व आपल्या देवांसह नौकेत बसले. नौका चालू लागली. प्रवाहाच्या उलट दिशेला नाव न्यायला फार कष्ट पडत होते. अशा प्रकारे नाव मिरज घाटाजवळ आली. घाटावरच मुक्काम केला. देवार्चन झाले. स्नानादी विधी येताक्षणीच झाले. तेथे श्रीविष्णू मंदिरात काही काल वास्तव्य केले. तेथील थाट अपूर्वच होता. कित्येक पाद्यपूजा घडल्या. मग सांगलीहून श्री महाराज श्री जगदंबावास्तव्याने सुशोभित अशा कोल्हापूरक्षेत्राला गेले. हीच ती गया पुण्यभू श्रीगंगानुजाने पाहिलेली.

**समानर्च्याँबिकांदेवीं यात्रां कृत्वा यथाविधि ।।**
**दिगंबरेति नाम्ना वै नादयामास पत्तनम् ।।८५।।**

कोल्हापुरी जाताच श्रीमहालक्ष्मीची महापूजा श्री महाराजांनी विधिपूर्वक व्यवस्थित केली. यथोक्त यात्रा शिष्यगणांसह केली. कित्येक लोकांच्या मन:कामना पूर्ण केल्या. अनेक दैवी चमत्कार दाखविले. कोल्हापुरी श्री महाराजांचे राहणे त्यांचे प्रिय भक्त हरिभाऊ कडेकर यांचे घरी होते. त्यांचे घर त्या वेळी भूवैकुंठच भासले. सर्व करवीर क्षेत्र “दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा” या नाममंत्राने निनादले. तेथील ग्रामस्थांना दुर्लभ सत्संग झाला. सर्वांना आनंद झाला.

**कंचित्कालं तत्र स्थित्वा पूरयित्वा मनोरथान् ।।**
**भक्तान्सनंदयामास कृत्वानैकचमत्क्रिया: ।।८६।।**

काही काल क्षेत्रस्थांच्या सुदैवाने कोल्हापुरी श्री दीक्षितमहाराज राहिले. भक्तांच्या सांसारिक यातना दूर केल्या. एकदा ते गोसंस्थेत सहज गेले. तेथे एक अतिशय खोडसाळ गाय होती. कोणालाही ती जवळ येऊ देत नसे. पण श्री महाराज गाय जवळ असलेल्या श्रीदत्तमहाराजांप्रमाणे दिसले. असे किती तरी चमत्कार करून भक्तांना दाखविले. त्यामुळे तेथील सर्व भक्त फारच आनंदित झाले.

**भक्ताधीन: प्रभुरयं भजकार्तिप्रणाशन: ।।**
**स्वीयाभीष्टकर: प्रायादमरव्यपुरं पुन: ।।८७।।**

श्रीप्रभू दीक्षितमहाराज आपल्या भक्तांच्या एकनिष्ठ भक्तीने त्यांच्या पूर्ण स्वाधीन झाले होते. भक्तांनी त्यांची महापूजा करावी. त्याना सुगंधी तेल लावून मंगलस्नान घालावे. आपल्या घरी भिक्षेकरता प्रेमाने न्यावे व परमभक्तीने पंचपक्वान्नाचे भोजन द्यावे, मोटारीत बसवून फिरावयास न्यावे. एका भक्ताने तर त्यांच्या हातात स्वत:च्या हातातील घड्याळ बांधले. अशी परोपरीनी भक्तांची

दीक्षितस्वाममिमहाराज पुन: अमरापुरी गेले.

**गुरूडेश्वरं गुरूक्षेत्र श्रीदत्तगुरूणासह ।।**
**भक्तैर्नाम्नानादयन्सानंदं भूमंडलं ययौ ।।८८।।**

अमरापुरीस श्री दीक्षित महाराज गेल्यानंतर श्रीगुरूक्षेत्र गरूडेश्वराला जावे आणि श्रीगुरू श्रीमद् वासुदेवानंदसरस्वतींचे दर्शन घ्यावे अशी तळमळ होऊ लागली. श्री महाराजांनी मनात विचार केला. श्रीगरूडेश्वराला गेलेच पाहिजे. श्रीगुरूमहाराजांची ती पुण्यभूमी आहे, श्री महाराजांच्या संचाराने पवित्र असे स्थान आहे. जाता जाता श्री सीताराममहाराज-अतिशय प्रिय गुरूभक्त–त्यांचे दर्शन होईल, श्रीदत्तोपासना मार्गाची स्थापना होईल व अनेक सद्भक्तांना मार्गदर्शन होईल असा विचार निश्चित केला. आपले देव श्रीदत्तमूर्ती आणि श्रीगुरूमहाराजांची मूर्ती बरोबर घेतली. निवडक शिष्यगणही बरोबर होते. असे सर्व भूमंडल "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" या नाममंत्राने दुमदुमन सोडीत श्रीअमरापुराहून श्री. दीक्षित महाराज गरूडेश्वरी निघाले. पवित्र तीर्थे व क्षेत्रे यांची यात्रा करीत करीत जात होते.

**गुरूसेवा कथं कार्या कथं वा गुरूशिष्यता ।।**
**दर्शिताऽऽदर्शभूता सा यां कृत्वा लभते परम् ।।८९।।**

आपल्या गुरूंची सेवा कशी करावयाची असते, कसे नि:सीम प्रेम ठेवावे, कसा आदर बाळगावा लागतो, गुरू व शिष्य कसे वागतात, गुरू आणि शिष्य यांचे प्रेम व नाते कसे असते याचा आदर्श श्री. दीक्षितमहाराजांनी आपल्या आचरणाने लोकांना दाखवून दिला. केवळ श्रीगुरूकृपेने परमलाभ कसा होतो, ते लोकांच्या नजरेस आणून दिले. गुरू आणि शिष्य असेच प्रेमळ असावेत असे लोक बोलत असत. अशी गुरूसेवा श्री महाराजांनी केली. तोच आदर्श पुढे ठेवून जर गुरूसेवा केली तर खात्रीने परमपदप्राप्ती होईल यांत संशय नाही.

**नहि नहि तीर्थं क्षेत्रं वाटीं वा पत्तनं वनं मन्ये ।।**
**यस्मिन्सद्गुरूमहिमा यत्तन्नाभूच्चमत्कृतिर्विपुला ।।९०।।**

श्री. दीक्षितमहाराजांच्या सर्वत्र संचारात असे एकही खेडे, शहर, तीर्थ किंवा क्षेत्र नाही की ज्या स्थानी श्री. दीक्षितमहाराजांनी आपल्या श्रीगुरू श्रीमद् वासुदेवानंद सरस्वतींची कीर्ती वाढविली नाही अथवा ज्या ठिकाणी पुष्कळ चमत्कार दाखविले नाहीत. सर्वत्र श्रीदत्तोपासनेचा प्रसार केला व श्रीगुरूमहिमा वाढविला व अनेक दैवी चमत्कार दाखविले. संचार करीत करीत, पुण्यस्थाने पाहात

पाहत महाराज गरूडेश्वरी आले. येताना श्रीसीराममहाराजांची भेट घेण्यास ते मुळीच विसरले नाहीत.

**यात्रामिषेणैव तत: स्वकीयान् ।**
**ज्ञानांजनेनाशु विशुद्ध सत्वान् ।।**
**कर्तुं प्रयाणोत्कमनास्तदानीम् ।**
**जगाम काशीं खलु पुण्यराशिम् ।।९१ ।।**

महाराज श्री गरूडेश्वरी जाताच त्यांना फार समाधान झाले. आपण कृतकृत्य झालो असे वाटले. श्री दीक्षित महाराजांनी आपल्या गुरूमहाराजांचे प्रेमाने दर्शन घेतले. यथाविधी पूजा केली. आनंदित झाले. श्री नर्मदेत स्नान करावे, नित्य विधी करावा आणि नंतर श्री समाधीजवळ बसावे. महापूजा करावी, स्तोत्रे म्हणावी आणि कितीतरी वेळ ध्यान करावे. पूजा व आरती चालली म्हणजे श्रीदीक्षितमहाराजांच्या डोळ्यांतून पूर लोटत असे. नंतर श्री नैवेद्य समर्पण करावा आणि आपण प्रसाद घ्यावा आणि दुपारी श्रीमहाराजांचे चरित्र-वर्णन चाले. प्रसादाला पुष्कळच लोक येत. अन्नसंतर्पण फार मोठ्या प्रमाणात चाले. असा नित्यक्रम असे.

याप्रमाणे काही काल श्रीगरूडेश्वरी वास्तव्य करून नंतर यात्रेच्या निमित्ताने आपल्या भक्तांना ज्ञानामृत पाजून कृतार्थ करावे या उद्देशाने दीक्षितमहाराज श्रीगरूडेश्वराहून श्रीगुरूमहाराजांचा निरोप घेऊन मुक्तिक्षेत्र पुण्यमय अशा काशी क्षेत्री गेले.

**निलिंपनिर्झरिण्यां स: स्नात्वा विश्वेशपूजनम् ।।**
**कृत्वा यात्राविधिं सम्यगवसच्छांत मानस: ।।९२ ।।**

श्रीकाशी क्षेत्रात पोहोचल्यानंतर श्री दीक्षितमहाराजांनी आपल्या शिष्यगणांसह देवगंगा (श्रीभागीरथीत ) स्नान केले. यथाविधी, स्नानानंतर श्रीविश्वेश्वराची षोडशोपचार, यथोक्त व यथासांग महापूजा केली. काशीतील यात्राविधी पण यथायोग्य केला आणि समाधानाने काशीतील तारक मठात राहिले. काशीक्षेत्र हे पुण्याची राशीच होय. श्री दीक्षितमहाराजांचे ते आश्रमधर्मचरण आणि प्रेमाने केलेले देवतार्चन व सुहास्य आणि प्रसन्न, तेजस्वी, श्रीमहाराजांची मूर्ती पाहून सर्व काशी क्षेत्रस्थांना त्यांचा लळा लागला.

**मनस्थानीय तत्रस्थो गुरोस्तु वचनामृतम् ।।**
**गमिष्यामि कदाऽयोध्यामिति चिंतनतत्पर: ।।९३ ।।**

काही काल शांत मनाने श्री दीक्षितमहाराज काशीक्षेत्री राहिले. सहज श्री टेंबेस्वामी महाराजांचे-आपल्या सद्‌गुरूचे-अमृतमय वचन श्री महाराजांच्या लक्षात आले ते -

**राममाश्रय राममाश्रय राममाश्रय भद्रदम् ।।**
**राममाश्रयतां कुतोऽपि भवेत्कुदैवमभद्रदम् ।।**
**यस्य नामवशाच्छिला अपि सिंधुना हि सुमुध्दृता: ।।**
**ते जडा अजडा भवंति न किं वदात्र सुमुध्दृता: ।।**

श्री रामचंद्राचा आश्रय कर-आधार निश्चयाने घे. असे तीन वेळा सांगितले. आणि म्हणतात, की ‘ज्याने रामाचा आश्रय केला आहे त्याला दुदैव कधीही बाधा करणार नाही. समुद्रावर सेतू बांधण्याचे वेळी रामनामांकित दगडही सागराने आपल्या पोटात घेतले नाहीत. ते दगड-जड निर्जीव होते. तर मग सजीव मानव श्रीरामाच्या आश्रयाने भवसिंधूच्या पलीकडे जाणार नाहीत काय ते सांग पाहू’ असा श्रीगुरूमहाराजांनी जनतेला प्रश्न विचारला आहे. हे श्रीगुरूमहाराजांचे हित-कराक व अमृतमय वचन लक्षात येताच श्री दीक्षितमहाराजांना वाटले की आपण आता अयोध्येला केव्हा जातो व श्रीरामदर्शन केव्हा घेतो. केव्हा ती अयोध्या दिसेल !

याच विचारात श्रीमहाराज काही दिवस गढून गेले आणि लोकांजवळही तसेच बोलू लागले.

**पंचक्रोशीं प्रयागं च गयायात्रां यथाविधि ।।**
**अभूतपूर्वी संपाद्य गमनायोपचक्रमे ।।९४।।**

श्री दीक्षितमहाराजांचा अयोध्येला जाण्याचा निश्चय झाला. नंतर त्यांनी सर्व यात्रा पूर्ण करूनच जावे असे ठरविले. प्रथम पंचक्रोशी यात्रा केली. नंतर प्रयागाला गेले. शिष्यगणासह ती यात्रा झाली. मग गयेला गेले. तीही यात्रा केली. या सर्व यात्रा फारच व्यवस्थित व यथाविधी केल्या. त्या त्या तीर्थावरील लोक अशी यात्रा आजपर्यंत कोणीही केली नाही असे म्हणाले. सर्व यात्रा संपवून श्री महाराज श्रीकाशीक्षेत्री तारक मठात आले व अयोध्येला जाण्याच्या विचाराला सुरूवात झाली.

**तदा काशीपुरस्थास्तु विव्हला: प्रार्थनातुरा: ।।**
**तादृशान्तान्समालोक्य जगादातीव वत्सल: ।।९५।।**

श्री महाराजांच्या प्रेमळ सहवासाने श्रीकाशीक्षेत्रस्थ लोक मोहित झाले होते. त्यांच्याबद्दल त्यांना फारच आदर वाटत होता. पण ज्या वेळी श्री महाराज अयोध्येला जाणार असे समजले तेव्हा सर्व क्षेत्रस्थ तारकमठात आले. आणि श्री महाराजांना म्हणाले, महाराज ! आपण हे क्षेत्र सोडून जाऊ नका. येथेच

राहा. म्हणजे आपले दर्शन आम्हाला रोजच्या रोज होईल. अशी प्रार्थना केली. ते फारच दु:खित झाले होते. त्या अवस्थेत असलेल्या क्षेत्रस्थांना पाहून अतिशय दयाळू आणि कनवाळू व प्रेमळ श्री महाराज त्यांना म्हणाले,

**पुनरागम्यते नूनं मा चिंतां कुरूतेति मे ।।**
**वाराणसीपुरस्थान्स: समाश्वास्य ययौ द्रुतम् ।।९६।।**

लोकहो ! मी पुन: येतो. माझ्या वचनावर विश्वास ठेवा. माझ्यासाठी मुळीच काळजी करू नका. असे सर्व काशी क्षेत्रातील लोकांचे प्रेमाने समाधान श्री दीक्षितमहाराजांनी केले. प्रेमळ भक्तांशी श्रीप्रभू फार प्रेमळ असतात. पुन: येण्याचे आश्वासन दिले. आणि श्री महाराज मोक्षपुरी तीदेखील पहिलीच अशा पवित्र श्री अयोध्यापुरीला गेले.

**सोत्कंठा: खलु तत्रस्था: पुनर्दर्शनकांक्षिण: ।।**
**बभूवु: शांतमनसो वचो मिथ्या कथं गुरो: ।।९७।।**

पुन: श्री महाराज आले म्हणजे दर्शन म्हणजे होईल. सत्संगती लाभेल. श्री महाराजांचे वचन खोटे कसे असेल-होईल. म्हणून शांत चित्ताने व मोठ्या उत्सुकतेने काशीक्षेत्रातील प्रेमळ भक्त वाट पाहात राहिले. केव्हा श्री महाराज येतात, आणि आपल्याला त्यांचे दर्शन केव्हा होईल असे सर्वांना झाले. वस्तुत: श्रीमहाराजांचा वियोग होऊच शकत नाही. कारण ते जीवरूपाने सर्वांच्या ठिकाणी आहेतच. पण लौकिक दृष्टीने तसे वाटणारच हे नि:संशय सत्य आहे.

**ज्ञात्वा मंदारकुसुमसौरभ्यं वाऽमृतं कदा ।।**
**रमते बब्बुलसुमेऽथवा तक्रे कथं नर: ।।९८।।**

ज्याला कल्पवृक्षाच्या पुष्पांचा सुगधं दैवयोगाने मिळाला किंवा अमृत मिळाले म्हणजे त्याची गोडी ज्याने चाखली, तो बाभळीच्या फुलाच्या वासाने किंवा ताकाने कसा आनंदित होईल ?

**राममाश्रयेति वचो सत्यं कर्तुं स योगिराट् ।।**
**गुरोरयोध्यामगमद्रामसंदर्शनोत्सुक : ।।९९।।**

सर्व भावांनी श्रीरामचंद्राचा आधार घ्या असे श्रीगुरूटेंबेस्वामी महाराजांनी सांगितलेले अमृतवचन होते. आणि जे श्री क्षेत्रकाशीमध्ये श्री दीक्षितमहाराजांच्या लक्षात आले. ते सत्य करण्यासाठी श्रीरामदर्शनाविषयी अतिशय उत्सुक असे श्रीमहाराज अयोध्येला गेले.

**गणहीनो बभूवाथ गुणहीनोऽपि सर्वदः ।।**
**सगणं सुगुणं देवं पूजयामास सर्वदम् ।।१०० ।।**

श्री काशीक्षेत्रात असतानाच महाराजांची प्रकृती बरी नव्हती. प्रसिद्ध अशा वैद्यराजाचे औषध, व्यवहार म्हणून ते आग्रहाने घेत होते. रोजचे कार्यक्रम श्रीभागीरथी स्नान, आश्रमधर्माचे काटेकोर पालन करीत होतेच. श्रीगुरूमहाराज व श्रीदत्तमहाराज यांच्या पूजेअर्चेत तर ते निमग्नच होत. तशाच स्थितीत अयोध्येला जाणे झाले. श्री महाराजांनी पवित्र शरयू नदीत शिष्यांसह स्नान केले. श्रीरामचंद्राचे पूजन, तेही प्रकृती बरी नसता व्यवस्थित केले. काही भक्तांना घरी जाण्यास आज्ञा केली. निर्गुण, निराकार असे श्री महाराज भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारे असूनही ते आता शिष्यगणरहित झाले. सगुण श्रीरामचंद्राचे पूजन केले. ते श्रीराम प्रभू सर्वकामना परिपूर्ण करणारे असेच आहेत.

**नयनसहचरं तं ब्रह्मवंशप्रसूतिम् ।**
**गुणभगिनिवरं तं वेदसत्कारमूतिम् ।।**
**शरनतशिरसं यः षष्ठमब्धिं चकार ।**
**वसुग्रहग्रहपालं नौमि पौलस्त्यकालम् ।।१०१ ।।**

श्रीरामचंद्राची यथासांग महाराजांनी पूजा केली. आणि नवग्रह संकलित श्रीरामाची स्तुती केली व नमस्कार केला. हे रामचंद्र ! आपण द्वितीय ग्रह जो चंद्र त्याचे नाव आपल्या नावापुढे धारण करता ! त्यामुळे आपली श्रीरामचंद्र अशीच सर्वत्र ख्याती आहे. ब्रह्म म्हणजे एक-पहिला जो रवि त्याच्या कुलातच आपण अवतार धारण केला. म्हणून आपल्याला रविकुलकमल दिवाकर म्हणतात. आणि गुण म्हणजे त्रिगुण-तीन. तीसरा ग्रह जो मंगळ त्याच्या बहिणीचे आपण पाणिग्रहण केले. मंगळ हा भूमिसुत आणि जानकी ही पण भूमिकन्या आहे. वेद म्हणजे चार, चौथा ग्रह बुध, बुध म्हणजे विद्वान, ज्ञानी. त्याच्या आदर-सत्काराची प्रत्यक्ष आपण मूर्तीच. आपण त्यांचा योग्य परामर्श घेता. आणि शर म्हणजे पांच. पाचवा ग्रह गुरू. आपले कुलगुरू वसिष्ठ आणि अधिकारी मोठी माणसे त्यांच्या चरणी आपण सदैव नम्र केले. कृष्णावतारात आपण सोळा हजार एकशे आठ स्त्रियांचे पती; पण या रामअवतारात एकपत्नीव्रत धारण केले. म्हणजे शुक्राला आपण शनैश्वर केले. वसु म्हणजे आठ आणि ग्रह म्हणजे नऊ. म्हणजे आठव्या आणि नवव्या ग्रहांना अमरत्व देऊन आपण त्यांचे पालन-रक्षण केले. श्रीप्रभूनी मोहिनीरूप घेऊन देवांना अमृत दिले. त्या वेळी देवांच्या ओळीत राहू येऊन बसला त्यालाही अमृत दिले. त्या वेळी देवांच्या ओळीत राहू येऊन बसला त्यालाही अमृत दिले. ते त्यांनी प्राशन केले. त्या वेळी सूर्यचंद्रानी हा दैत्य बसला आहे, असे सांगितले. मोहिनीरूपी भगवंतानी तत्काळ खड्गाने त्याचा शिरच्छेद केला. परंतु अमृतप्राशनामुळे त्याला अमर केले व ग्रहत्वही दिले ही कथा

मारून देवांना मुक्त केले आणि पृथ्वी निष्कंटक केली. त्या आपल्या चरणकमलाला मी सदर व भक्तिभावाने नमस्कार करतो.

**स्तुत्वैवं बहुभि: स्तोत्रैकरोद्‌बहुविस्तरम् ।।**
**श्रीरामस्य महापूजां सगणस्य यथाविधि ।।१०२।।**

**जानकीजानिमापूज्य कृत्वा कर्माणि शक्तित: ।।**
**कृतार्थतां च संपाद्य भौतिके ममतां जहौ ।।१०३।।**

अशाच पुष्काळ स्तोत्रांनी श्रीरामचंद्राचे स्तवन केले. आणि फार मोठ्या वैभवाने व विस्ताराने श्रीरामाचे पुन: पूजन केले. मारूतीचेही पूजन केले. अशी श्रीपूजा करून शक्तीप्रमाणे यथाविधी आश्रमकर्मेही केली. आता आपण कृतार्थ झालो, आपले कर्तव्य केले असे त्यांना वाटले. आणि श्रीमहाराजांना एक प्रकारचा सात्त्विक आनंद झाला. आता आपले अवतारकार्य संपले असे वाटून श्री. दीक्षित महाराजांनी शरीरावरील ममता सोडून दिली. कार्य काही उरले नाही. मग ममत्व कशासाठी करावयाचे ? कार्यापुरती ममता होती.

**बाळकृष्णस्य सान्निध्यात्पूजको परियादया ।।**
**दर्शिता यतिराजेन सतां कृपणता कुत: ।।१०४।।**

त्यांचा - श्री दीक्षितमहाराजांचा -पुजारीमंडळींवर राग मुळीच नव्हता. ते त्यांना चांगले वागण्यास सांगत होते. सज्जनांच्या मनात रागाला थारा नाही. लोकशिक्षणासाठीच ते रागावलो असे दाखवितात. राग असता तर त्यांच्या शेवटच्या कालात पुजारीकुलातील महाराजांचा परमभक्त बाळू याच्याकडून सेवा घेतली नसती, आणि बाळूच्या भावाला-कृष्णालाही-जवळ केले नसते.

**ग्रहवेदवसुभूशाकेऽयोध्यायां सरयू भृगौ ।**
**आश्विनाऽसित सप्तम्यां दिनमध्यगते रवौ ।।१०५।।**
**प्रभवे वत्सरे चंद्रवासरे हृदयस्थित: ।।**
**ब्रह्मरूपोऽभवत्सद्यस्त्यक्त्वा तां लौकिकीं तनुम् ।।१०६।।**

श्री दीक्षितमहाराजांना त्या वेळी प्रसिद्ध वैद्यराजांची औषधे चालू होती. तरीदेखील आराम न पडता ते फारच क्षीण झाले होते. सर्व नित्याचे अनुष्ठान, देवांचे व श्रीगुरूंचे पूजन चालू होतेच. श्री महाराजांनी अनुष्ठान व्यवस्थितपणे पूर्ण केले आणि ते आपल्या श्रीगुरूदेवांजवळ झोपले. त्याच वेळी श्रीगुरूभक्त बाळू पुजारी सरयूचे स्नान करून श्रीमहाराजांचे जवळ येऊन नम्र होऊन उभा राहिला.

त्याला पाहून महाराज म्हणाले, बाळू ! उभा का ? बैस. हे महाराजांचे बोलणे ऐकताच तो त्यांच्याजवळ बसला. श्री महाराजांनी बाळूचा उजवा हात आपल्या हातात धरला. श्री गुरूभक्त बाळू

किती भाग्यवान् ! किती पुण्यवान् पाहा. महाराजांनी त्याचा हात आपल्या हातात प्रेमाने घेतला. श्री महाराजांची ती अवस्था पाहून बाळूच्या डोळयांतून अश्रू वाहू लागले. श्री महाराजांचेही डोळे भरून आले. तेव्हा बाळू म्हणाला-महाराज ! आमचे आता पुढे कसे होणार ? आम्ही काय करावे ? त्या वेळी श्री महाराज म्हणाले, 'बाळू दु:ख करू नको. सर्वांनाच मरण अटळ आहे. आमच्या श्रीगुरूमहाराजांनी जे केले आणि त्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्हीही जे अखंड आचरिले तेच हितकारक आहे. ते तू कर.' बाळू म्हणाला, 'महाराज आपल्या श्रीगुरूमहाराजांनी आणि आपण काय केले ते मला सांगा. त्यावेळी अगदी क्षीण झालेले महाराज मंद पण स्पष्ट म्हणाले-बाळू ! "**दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा**", हा श्रीदत्त नाममंत्र तू अखंड जपत जा. म्हणजे तुझे सर्व मंगलमय होईल. काळजी करू नको.' एवढे बोलून श्री महाराज थांबले.

हा उपदेश शेवटचाच ठरला. बोलणे बंद झाले. आणि थोड्याच वेळात **शके १८४९ प्रभव संवत्सर आश्विन वद्य सप्तमी सोमवार दुपारी १२ वाजता** स्वत:च ठरविलेल्या वेळी सर्वांच्या हृदयात नेहमी असलेले. **श्री. प. प. श्रीमन्नृसिह सरस्वती दीक्षितमहाराज** लौकिक पांचभौतिक देहत्याग करून परब्रह्मी लीन झाले.

**लोकदृष्ट्या गतो भाति भक्तकामप्रपूरक: ।।**
**अधुनाऽपि जयत्येष: श्रीनृसिंहसरस्वती ।।१०७।।**

श्री दीक्षितस्वामीमहाराजांनी देह विसर्जन केला. हाय ! हाय ! जगाला ज्ञानप्रकाश पुरविणारा ज्ञानसूर्य मावळला. लोकदृष्टीने जरी श्रीमहाराज आम्हाला वियोग शोकसागरात लोटून गेले असे वाटते, तरी ते आपल्या भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण करण्याविषयी जागृत आहेतच. आतासुद्धा श्रीमहाराज स्वभक्तांच्या इच्छा पूर्ण करतात.

**यादृशी भावना यस्य स तादृक्फलभाक् भवेत् ।।**
**कल्पद्रुमतले तिष्ठन् यदिच्छति तदाप्नुते ।।१०८।।**

जशी ज्याची भक्ती असेल, तसे त्याला अवश्य फळ मिळते. कल्पवृक्षाखाली बसलेला मनुष्य जे इच्छितो ते त्याला मिळते. पण सद्भावना पाहिजे. "ये यथा मां प्रपद्यन्ते" असे श्रीभगवदवचन प्रसिद्ध आहेच.

**श्रीगुरूप्रेरितेनाशुव्यलेखि चरितं मुदा ।।**
**पठनात्पानाठद्दिव्यं शाश्वतं पदमाप्नुयात् ।।१०९।।**

श्रीमहाराजांच्या प्रेरणेने हे श्रीचरित्र लिहिले. याचे जो पठण करील किंवा कथारूपाने सांगेल, त्याला श्रीकृपेने अक्षय्य असे दिव्य सुखमय स्थान मिळेल.

**वियद् ग्रहवसुभूशाके कन्या राशिगते गुरौ ।।**
**दशम्यां माघ शुक्लस्य गुरूवारे शुभे दिने ।।**
**कृष्णावेण्युत्सवे श्रीमच्चरितं पूर्णतामगात् ।।**
**अनेन प्रीयतां देवो दत्ताभिन्न: स सद्गुरू: ।।११०-।।**

शके १८९० माघ शु. १० गुरूवार कन्यागतात कीलक संवत्सरी श्रीकृष्णावेणीच्या उत्सवात हे चरित्र पूर्ण झाले. याने श्रीदत्तरूपी श्री दीक्षितस्वामीमहाराज संतुष्ट होवोत.

**इति कोडणीकराभिजन बापूशास्त्रिविरचितं प. प. श्रीमन्नृसिंह सरस्वती दीक्षित स्वामीमहाराजानां सभाषांतरं चरितामृतं समाप्तम्**

**।। श्रीगुरूदेव दत्त ।।**

कोडणीकर कुलातील बापूशास्त्री याने लिहिलेले प. प. श्रीमन्नृसिंहसरस्वती दीक्षितस्वामीमहाराजांचे चरितामृत भाषांतरासह संपूर्ण झाले.

**।। तत्सत् ।।**